| 5 | सरदार वल्लभभाई पटेल : नोकरशाही व प्रशासक विषयक विचार | डॉ. सुरेखा भिंगारदिवे | 17 |
| 6 | संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. अर्चना बच्छाव | 19 |
| 7 | बागलानातील सारा वाढविरोधी चळवळीला प्रेरक दीपस्तंभ सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. संदीप भामरे | 23 |
| 8 | सरदार वल्लभभाई पटेल आणि 1928 चा बार्डोली सत्याग्रह | प्रा. गणेश विघाटे | 26 |
| 9 | लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. मधुकर साठे | 32 |
| 10 | हैद्रावाद संस्थान विलीनीकरनात सरदार पटेलांची भूमिका | प्रा. जे.एल. जायेवर | 38 |
| 11 | संस्थानांचे विलीनीकरण आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. राजेंद्र काळे | 41 |
| 12 | हैद्रावाद संस्थान विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. विकास टकले | 45 |
| 13 | वल्लभभाई पटेल एक आदर्श स्वातंत्र्य-सेनानी | डॉ.सय्यद मुजीबमुसा | 48 |
| 14 | कुशल प्रशासक सरदार पटेल | प्रा. शितल धरम | 51 |
| 15 | सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधी | प्रा.एच.एल.पंडूरे | 53 |
| 16 | सरदार वल्लभभाई पटेल आणि अखंड भारत | डॉ. बाळासाहेब कर्पे | 56 |
| 17 | सरदार वल्लभभाई पटेल व भारतीय संस्थाने | प्रा. अशोक बीडगर | 60 |
| 18 | सरदार वल्लभभाई पटेल आणि झेंडा सत्याग्रह | प्रा. अमोल बोत्रे | 65 |
| 19 | संस्थानाचे विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | डॉ. संतोष पहारे | 67 |
| 20 | सरदार वल्लभभाई पटेल एक लोहपुरुष | डॉ. बी. डी. गव्हाणे | 72 |
| 21 | सरदार वल्लभभाई पटेल व स्वतंत्र भारतातील नोकरशाही सहसंबंध | प्रा. एस.व्ही. निळे | 75 |
| 22 | सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित नेहरू यांचे संस्थाने विलीनीकरणातील योगदान | डॉ. मनिषा जगदाळे (कुरुमकर) | 78 |
| 23 | संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य | डॉ. रघुराज कुरुमकर | 81 |
| 24 | सरदार वल्लभभाई पटेल आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ | डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड | 85 |
| 25 | संस्थानांचे विलीनीकरण आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा.लहू काकडे | 88 |
| 26 | सरदार वल्लभभाई पटेल यांची राजकीय विचारप्रणाली | प्रा. अनिल मते | 92 |
| 27 | सरदार वल्लभभाई पटेल आणि संस्थानांचे विलीनीकरण | प्रा.ज्ञानेश्वर पादर | 94 |
| 28 | सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन कार्याचा अभ्यास | प्रा.गोरख रूपनवर | 97 |
| 29 | राष्ट्रीय एकीकरणाचे जनक सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. संदीप शिरसाठ | 100 |
| 30 | देशी राज्याच्या एकीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान | डॉ. रघुनाथ शेळके | 104 |
| 31 | जागृती आणि सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. सचिन मोरे | 109 |
| 32 | सरदार पटेल यांचे अहमदनगर किल्ल्यातील वास्तव्य | डॉ.एस.आर.पगारे, प्रा.डी.पी.बागुल | 113 |
| 33 | संस्थानाचे विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. एन.पी.सदाफळे | 116 |


K.S. ARTS & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 85 (B) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# हैद्राबाद संस्थान विलिनिकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका

प्रा.विकास भानुदास टकले,
इतिहास विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,राहू

**प्रस्तावना**

लोह पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म करमसद जिल्हा खेडा गुजरातमध्ये झाला. इग्लंडमध्ये त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. आणि गुजरातमध्ये अहमदाबादमध्ये वकिलीचा व्यवसाय सुरू केला. सरदार वल्लभभई पटेल महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रभावीत झाले व स्वातंत्र आंदोलनात सक्रिय सहभागी झाले. स्वातंत्र आंदोलनामध्ये सरदार पटेलांचे सर्वप्रथम व सगळयात मोठे योगदान म्हणजे खेडा सत्याग्रह होय. बार्डोली या ठिकाणी प्रभावीपणे आंदोलन केले म्हणून त्यांना सरदार ही पदवी देऊन गौरवीण्यात आले.[१] सरदार वल्लभभई पटेल हे १९३७ पर्यंत दोन वेळा राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. भरतीय स्वातंत्र्यानंतर भरताच्या राजनैतीक एकिकरणामध्ये त्यांचे महान योगदान राहीले आहे. त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या दृढनिश्चयामुळे त्यांना लोहपुरूष म्हणून ओळखले जाऊ लागले. सरदार वल्लभभई पटेल हे स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान होते,त्याचबरोबर त्यांच्याकडे गृह,सुचना व संस्थाने विभाग होता. त्यांनी भारतातील लहान मोठी ५६२ संस्थाने भारतीय गणराज्यात सामील केली.[२] ही सरदार वल्लभभाई पटेल यांची भारत देशाला दिलेली महान देणगी आहे.

**हैद्राबाद संस्थान विलिनिकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका**

०३ जुलै १९४७ ला निजामाने घोषणा केली की हैद्राबाद भारत किंवा पाकिस्तानच्या संसदेकडे आपला प्रतिनिधि पाठवणार नाही. आणि दुसरीकडे १५ ऑगस्ट १९४७ ला हैद्राबाद एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित केले.[३] ११ जुलै ला निजामाने एक शिष्टमंडळ भारत सरकारकडे नवाब छतारी यांच्या अध्यक्षतेखाली पाठविले. या शिष्टमंडळाने वऱ्हाड प्रांत पुन्हा निजामाला दयावा अशी मागणी केली. त्याचबरोबर हैद्राबादला स्वतंत्र देण्यात यावे. परंतु निजाम विलिनिकरणाच्या करारावर सही करण्यास तयार होत नव्हता.परंतु सरदार वल्लभभाई पटेल हे विलिनिकरणाच्या मतावर ठाम होते. त्यामुळे २५ जुलै १९४७ ला नवाब छतारीला नरेश मंडळाच्या चर्चा समितीमध्ये समाविष्ठ करण्यात आले. परतु हैद्राबादचे प्रतिनिधि मंडळ कोणत्याही निर्णयाविना माघारी गेले. हैद्राबादला विलिनिकरणाच्या मुद्दयावर विचार करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला.

सर वाल्टार मांटकन यांनी विलिनिकरण प्रस्तावात काही सुधारणा करून निजामासाठी प्रस्तावाच्या नावात बदल करण्याची सुचना मांडली. परंतु सरदार वल्लभभाई पटेल यांना हा विचार आवडला नाही. कारण निजामासाठी असे करणे म्हणजे इतर संस्थानीकांचां विश्वासघात केल्यासारखे होईल. सरदार वल्लभभाई पटेल यांचे असे मत होते की,"हैद्राबादच्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार निजामास नाही,तर त्याच्या प्रजेला आहे."[४] सरदार वल्लभभाई पटेल यांना असेही वाटत होते की, वऱ्हाडच्या बाबत निजामाच्या प्रजेचा निर्णय मान्य केला जाईल,पण निजामाने यास मान्यता दिली नाही. याच वेळी तीन लाख रूपये किंमतीची हत्यारे जेकोस्लोव्हाकियाकडून खरेदी करण्याचा प्रयत्न निजामाने केला.[५] भारत सरकारने याच दरम्यान हैद्राबाद विलिनिकरणा विषयीच्या कराराची एक रूपरेषा बनविली. पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि लॉर्ड माऊंटबॅटन याच्या व्यतिरिक्त हैद्राबादचे प्रतिनिधि सर वाल्टर मांकटन,नवाब छतारी व सर सुलतान अहमद यांनी

हा करार स्विकारला. हा प्रस्ताव निजामाच्या मान्यतेसाठी २२ ऑक्टोबर १९४७ रोजी एका शिष्टमंडळाच्यामार्फत हैद्राबादला पाठविण्यात आला. परंतु याच काळात हैद्राबादमध्ये अशांतता निर्माण झाली. निजामाने नवाब मोईनजंग व आब्दुल रहिम यांच्या शिष्टमंडळात पिंगले वेंकटरमन रेड्डी यांचा समावेश करून त्यांना ३१ ऑक्टोबर रोजी दिल्लीला पाठविले. पुन्हा एक शिष्टमंडळ आलेले पाहून सरदार वल्लभभाई पटेल नाराज झाले. याच दरम्यान हैद्राबादचे प्रशासन कासिम रिझवीच्या हातात आले. हैद्राबादसंबंधी त्याने दिल्ली येथे सरदार वल्लभभाई पटेल व वी.पी मेनन यांची भेट घेतली. या भेटीतील कासिम रिझवीची भाषा ही धमकीची भाषा होती.

२९ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांनी हैद्राबादबरोबरच्या शांतता कराराची घोषणा संसदेमध्ये केली. ३० जानेवारी १९४८ रोजी नवाब मोईनजंग यांच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ दिल्लीत आले. या शिष्टमंडळात लायक अली हेही होते. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांची भेट घेतली. सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांना हैद्राबादमध्ये सांप्रदायीक शांतता निर्माण करावी असे सांगीतले. १५ एप्रिल रोजी लायक अलीने पंडित नेहरू यांची भेट घेतली. १६ एप्रिलला ते सरदार वल्लभभाई पटेल यांनाही भेटले. त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले की, "कासिम रिझवीच्या व्याख्यानांना दृष्टीआड केले जाऊ शकत नाही. हैद्राबादचे भाग्य अन्य राज्यांपेक्षा वेगळे असू शकत नाही. जर जुने राजकिय विभाग आज असते तर, हैद्राबादच्या वर्तमान स्थितीला एक क्षणभरही सहन केले गेले नसते."[६] त्याचबरोबर त्यांनी असेही संकेत दिले की,मी हैद्राबादच्या स्वातंत्र्याला कधीही मान्यता देणार नाही.जर कासिम रिझवी स्वातंत्र्याच्या मागणीवर आडून राहीला तर तो निश्चित अपयशी होईल.आणि अखेर शेवटी लायक अलींना हैद्राबादला पाठवून निजामाबरोबर आंतीम विचारविमर्श करावा असे सांगीतले.

१३ जून रोजी पंडित नेहरू, वी.पी मेनन आणि लॉर्ड माऊंटबॅटन सरदार वल्लभभाई पटेल यांना भेटण्यासाठी डेहराडून या ठिकाणी गेले. तेथे लॉर्ड माऊंटबॅटन यांना निजामाशी तडजोड करण्याचे अधीकार देण्यात आले. लॉर्ड माऊंटबॅटन यांना तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु निजामाने सहकार्य केले नाही. यादरम्यान रझाकारांच्या अत्याचारांनी अन्यायाची परिसिमा गाठली होती. दरम्यान लायक अली हैद्राबादचा विषय संयुक्त राष्ट्रसंघामध्ये घेऊन जाण्याची योजना आखत होते. निजामाने तर अमेरीकेच्या अध्यक्षांनाच पत्र पाठवून हैद्राबादच्या प्रश्नात लक्ष घालण्याची विनंती केली. परंतु त्यांनी ही विनंती अमान्य केली.[७] सरदार वल्लभभाई पटेल हे हैद्राबादचा विषय संयुक्त राष्ट्रसंघामध्ये घेऊन जाण्याच्या विरोधात होते.

हैद्राबाद संस्थान भारतात विलिन करण्यास मात्र निजामाने नकार दिला. त्यामुळे शेवटी हैद्राबाद संस्थान भारतात विलिन करण्यास सैनिकी बळाचा उपयोग करण्याचे ठरले. हैद्राबाद संस्थान विलिनिकरणासाठी सैनिकी कारवाई करणे अपेक्षित होते,पण यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू सहमत नव्हते. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना सल्ला दिला की, "सैनिकी कारवाईने हैद्राबादचा प्रश्न सोडविण्यात पूर्ण धोका आणि अनिश्चितता आहे."[८] पंडित नेहरूंच्या मते सैनिकी कारवाई थांबविण्यात यावी. त्यामुळे राष्ट्रिय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतागुंत निर्माण होऊ शकते.. त्यावेळी त्यांनी तत्कालीन व्हाईसराय लॉर्ड माऊंटबॅटनने सरदार वल्लभभाई पटेल यांना सल्ला दिला की, हा प्रश्न भरताने लष्करी कारवाई शिवाय सोडवावा. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूही लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या मतासी सहमत होते. त्यांनाही हैद्राबाद विलिनिकरणाचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविला जावा असे वाटत होते. परंतु सरदार वल्लभभाई पटेल यांना माऊंटबॅटन व नेहरूंचा सल्ला पटला नाही. सरदार वल्लभभाई पटेल यांचे असे म्हणने होते की,"हैद्राबादच्या अशा वागण्याला सहन केले जाऊ शकत नाही"



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 85 (B) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

निजामाच्या शस्त्रास्त्रेखरेदिवर ते म्हणाले की, " हैद्राबाद हा भारताच्या पोटातील कॅसर सारखा आहे व याचा उपाय म्हणजे सर्जरीच असेल."[९] जेव्हा भारताकडे निजामाला समजाविण्याचा कोणताही मार्ग शिल्लक राहीला नाही, तेव्हा हैद्राबाद संस्थानावर सैनिकी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या अभियानाचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल यांनी जनरल जे.एन चौधरी यांच्याकडे दिले. आणि त्यांना अतिशय वेगाने हे काम करण्याच्या सुचना दिल्या. भारतीय सैन्याने हैद्राबादमध्ये १३ सप्टेंबर रोजी दोन्ही बाजूने हल्ला केला. भारतीय सेनेच्या या कारवाईला 'ऑपरेशन पोलो' असे म्हटले जाते. १३ व १४ सप्टेंबरला थोडा प्रतीकार झाला. परंतु तीसऱ्या दिवसी विरोध शांत झाला. १७ सप्टेंबरच्या संध्याकाळी हैद्राबाद संस्थानच्या सैनिकांनी हत्यारे खाली ठेवली. या कारवाईमध्ये १७७३ रझाकार मारले गेले. हैद्राबाद संस्थानचे ७१८ जवानही मारले गेले. भारतीय सेनेचे ६६ जवान मारले गेले तर ९७ जवान जखमी झाले.[१०] अशा प्रकारे भारतीय सैन्याने व सरदार वल्लभभाई पटेल यांनी अतिशय नियोजनबध्द रीत्या एका आठवडयातच हैद्राबाद संस्थान भारतात विलिन केले.

## समारोप :

लोहपूरूष या नावाने प्रसिध्द असणारे सरदार वल्लभभाई पटेल यांना त्यांच्या कार्यकालात भारताचे गृहमंत्री म्हणून काश्मिर व हैद्राबाद या संस्थानांच्या गंभीर व कठिन प्रश्नांचा सामना करावा लागला. वास्तविक पहाता या आधिच काश्मिर प्रश्नाचा निकाल भारताच्या बाजूने लागला असता.राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार करता हैद्राबाद हे देशातील सगळयात मोठे संस्थान होते. या संस्थानाचे एकुण क्षेत्रफळ हे इंग्लड व स्कॉटलंड या देशांच्या एकुण क्षेत्रफळाऐवढे होते. भारत स्वतंत्र झाल्यावर येथील अनेक राजे–रजवाडे भारतात बिलिन झाले. परंतु काश्मिर व हैद्राबाद संस्थाने भारतात विलिन होण्यास तयार नव्हती. हि दोन्ही संस्थाने एक स्वतंत्र देश म्हणून मान्यता मिळविण्याच्या प्रयत्नात होती. हैद्राबादच्या निजामाने विलिनिकरणास नकार दिल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सरळ–सरळ भारतात विलिन होण्याचा आग्रह हैद्राबाद संस्थानाकडे केला. हैद्राबाद भारतात विलिन करून तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी एकसंध भारत निर्माण केला. जर सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपल्या दृढ राजनैतीक इच्छाशक्तीचा परिचय देऊन जर हैद्राबाद मध्ये सैनिकी कारवाई केली नसती तर आज हैद्राबादही काश्मिर प्रमाणे भारताची कायमची डोकेदुखी होऊन बसला असता.

## संदर्भग्रंथसूची

१. केळकर मो.वा,(१९९८)," सरदार पटेल चरीत्र ", वरदा प्रकाशन, पुणे
२. शास्त्री चंद्रशेखर,(१९६३),"राष्ट्र निर्माता सरदार पटेल", सोसायटी फॉर पार्लेमेंटरी स्टडीज,नवी दिल्ली,पान नं – १६१
३. तत्रैव,पान नं – १६१
४. तत्रैव,पान नं – १६२
५. तत्रैव,पान नं – १६८
६. तत्रैव,पान नं – १७२
7- News Paper - Navabharat , 17 September 2018
8- News Paper - Navabharat , 17 September 2018
9- News Paper - Navabharat , 17 September 2018

M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

PRINCIPAL
Art's & Commerce College
Rahu, Tal.Daund, Dist.Pune.



Scanned by CamScanner

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

9

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



अतिथी संपादक :

**डॉ. इंद्रजित जाधव**

प्राचार्य,

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :

**डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर**

मराठी विभाग प्रमुख

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :

**प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुख्य संपादक :

**डॉ. ध[illegible] धनगर**

K.S.M'S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019 Special Issue – 82 [A]

## पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा

अतिथी संपादक :
प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक संपादक :
डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर,
मराठी विभाग प्रमुख,
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक सहसंपादक
प्रा. पोपट माने
डॉ. पुरुषोत्तम काळे

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

K.S.M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | ठाकर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर ढोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमूलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील खामगळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन | प्रा.चांगुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र खंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नढे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद धिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा बेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तिरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एम. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला भोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी भोसले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि इतर कला | प्रा.अमोगसिद्ध चेडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ.नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर बैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |


ART'S & COMMERCE ... RAHU PUNE



Scanned with OKEN Scanner

# पटकथा लेखन स्वरूप व चिकित्सा

शुभांगी दामोदर बारवकर
मु.पो. राहू ता.दौंड जि.पुणे
भ्रमनध्वनी ९४०३००५०४०

प्रास्ताविक :

*संबंध जगातील मनोरंजन उद्योगाचा विचार करता चित्रपट हे प्रभावी माध्यम आहे. नाविन्य, कल्पकता व कलात्मकता यांचा त्रिवेणी संगम या चित्रपट माध्यमातून आपणांस दिसतो. तसेच चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक वास्तवाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न वेधकतेने केला जातो. दिवसेंदिवस इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे महत्त्व मोठया प्रमाणात वाढत आहे. चित्रपट हे माध्यम इलेक्ट्रॉनिक माध्यमाची एक शाखा म्हणून ओळखले जाते. भारतीय कलासृष्टीमध्ये विविध कलांचा समावेश असला तरी त्यात चित्रपटांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. एक प्रभावी दृकश्राव्य माध्यम म्हणून चित्रपट संज्ञापनाकडे बघितले जाते. चित्रपटाचे आशय, कथानक, वेळ यांच्या आधारे लघुपट, माहीतीपट आणि चित्रपट असे प्रकार पडतात.*

लघुपट :--

काही मिनिटांच्या माहितीपटाला किंवा चित्रपटाला लघुपट (Short Film) असे म्हणतात. स्थानिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत सर्व विषयांना स्पर्श करण्याची ताकद बाळगणारे लघुपट हे एक प्रभावी माध्यम आहे. एखादा विषय कमीत कमी वेळेमध्ये प्रेक्षकांसमोर मांडण्याची कौशल्य लघुपटांमध्ये दिसतात. तीन ते चार लघुपटांची एकत्र सांगड घालून एखाद्या सिनेमाची निर्मिती होऊ शकते. आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवांमार्फत अनेक भारतीय संकल्पना विचार जगाच्या कानाकोपऱ्यात आज पोहोचवत आहेत- (Shairing Personal Expression Tecnology) या सर्वांचा उपयोग करून आपले छोटे छोटे अनुभव अभासी माध्यमातून व्यक्त आणि शेअर करण्यासाठी प्रत्येकाच्या मनात एक लघुपट तयार होत असतो. लघुपट प्रत्यक्षात बनवणे ही गोष्ट क्पहपजंस Tecnology आल्यामुळे तांत्रिक दृष्टया सोपी झाली आहे. डिजिटल माध्यमे सर्वांच्यात हाताशी सहजगत्या उपलब्ध झाल्याने लघुपट तयार करण्याकडे तरूण कलावंतांचा कल वाढला आहे. छोटासा प्रसंग घटना घेऊन त्याची सूत्रबध्द पटकथा तयार करायची आणि मनासारखे सादरीकरण करायचे असे प्रयोग हौशी कलावंत करतात या सशक्त माध्यमाचा अभ्यास करून ही कला विकसित करणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढत आहे. पूर्वी लघुपटांकडे संस्कार करण्याचे माध्यम म्हणून पाहिले जायचे पण आता लघुपटांमधून वेगवेगळया सामाजिक समस्या व त्याची हाताळणी दाखवता येते. मात्र त्यासाठी या लघुपटाकडे बघण्याचा प्रेक्षकांचा दृष्टिकोन बदलून त्यांना एक दृष्टी देण्याची गरज आहे. चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग हा लघुपटाकडे वळत नाही, कारण लघुपटाला करमणूक मूल्य नसून फक्त प्रबोधन मूल्य असते. अशी समजूत आहे. हया सर्व समजुतींना छेद द्यावा. लघुपटाच्या माध्यमातून दैनंदिन जगण्यातील अनेक समस्या अधिक प्रकर्षाने लोकांपुढे आणाव्या आणि प्रेक्षकांचे मनोरंजनातून समाज प्रबोधन न घडावे यासाठी युनिव्हर्सल मराठी माय मुंबई लघुपट महोत्सवामध्ये दाखविलेले लघुपट साम टीव्हीच्या शॉर्ट फिल्म शोकेस हया कार्यक्रमात युनिव्हर्सल मराठी कडून दाखविले जातात.

माहितीपट :--

एखादया घटनेबददल किंवा हकीकतीबददल माहीती देणारा चित्रपट म्हणजे माहितीपट असे म्हणतात. माहितीपटामधून प्रक्षकांपर्यंत एखादया पूर्णपणे माहिती उपलब्ध करून देणे हा हेतू असतो. उदा. सफर मराठी

ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

यांच्यातर्फे विविध किल्ले गड यांच्या संदर्भातील विविध माहितीपट उपलब्ध आहेत. उदा. सफर विजय दुर्गाची किंवा शिक्षणा संबंधित काही माहितीपट उपलब्ध आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांना या विभागातील माहितीपट उपयोगी पडत आहेत.तसेच आजचे जीवन सुकर व्हावे यासाठी दैनंदिन व्यवहारातील गोष्टी समजण्यासाठी काही माहितीपटाची निर्मिती करण्यात आलेली आहे. उदा. तंत्रज्ञान काल आज आणि उदया सायबर गुन्हे जनजागृती कॅशलेस, बँकिंग, एक पाऊल प्रगतीचे, सोशल नेटवर्कींग वापर, गैरवापर, ऑनलाईन बँकिंग सुरक्षा असे काही महत्वाचे माहितीपटांची निर्मिती झालेली दिसते.

चित्रपट:—

चित्रपट हे कलात्मकता व तंत्रज्ञान यांचा संगम असलेले सर्जनशील असे बहुजन माध्यम असून लोकरंजनाचे व लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. पडद्यावरील हालत्या–चालत्या प्रतिमांतून जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी ही गुंतागुंतीची कला छायाचित्रण आणि इतर तांत्रिक कौशल्य यांचे अपत्य होय. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून चित्रपट कलेचा विकास सातत्याने होत आला आहे.

१९ व्या शतकापासून चित्रपट हे माध्यम अस्तित्वात आले. चलचित्रणाच्या तंत्रामुळे प्रथमतः मूकपट निर्माण झाले.पुढे ध्वनिमुद्रनाच्या तंत्राची त्याला जोड मिळून बोलपट/बोलते चित्रपट अस्तित्त्वात आले १९१३ साली मराठी भाषेतील पहिला चित्रपट आयोध्येचा राजा प्रदर्शित झाला दिग्दर्शक दादासाहेब फाळके मराठी चित्रपट सृष्टीचे जनक यांनी त्याची निर्मिती केली.

चित्रपटाच्या ऐतिहासिक विकासक्रमात दीर्घ लांबीच्या कथाप्रधान चित्रपटांबरोबरच व्यंगचित्रपट, वार्तापट, अनुबोधपट, प्रसिद्धीपट, बालचित्रपट, सैनिकी चित्रपट,शैक्षणिक चित्रपट यांसारखे अनेक प्रकार उदयास आले. त्यापैकी मुख्य आकर्षण कथा चित्रपटांचेच होते. हे कथा चित्रपट, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक इ. विषयांवरील होते.

अनेकविध कलामाध्यमांपैकी चित्रपट या माध्यमाचे सामान्य माणसापर्यंत चांगल्याप्रकारे संवाद साधलेला आहे. चित्रपटाने सामान्य माणसांच्या रिकाम्या वेळेवर एक प्रकारे साम्राज्य गाजविले. लोकांची वेगवेगळी अभिरूची, बदलत्या सामाजिक, जाणिवा नव्या आशावादी संकल्पना ,सुप्त व अतृप्त इच्छा इत्यादी अनेक गोष्टींना चित्रपट माध्यमांनी आपल्या कलाविष्कारातून अत्यंत प्रभावी आणि परिणामकारकरीत्या जनसामान्यांपर्यंत पाहोचविण्याचे अद्वितीय कार्य केले आहे. चित्रपट म्हणजे सामान्यत: आपली कलात्मक जाणीव अशा स्वरूपाची आहे., कथेतील काही चांगल्या घटकांची गोळाबेरीज म्हणजे उत्तम चित्रपट.उदा. चांगली कथा + चांगले संवाद+ चांगला अभिनय इत्यादी घटकांची गोळाबेरीज म्हणजे चांगला चित्रपट होय.

संदर्भग्रंथ

१. मराठी चित्रपटाची पटकथा डॉ.अनिल सपकाळ – प्रतिमा प्रकाशन ,पुणे.
२. 'साहित्यकृतीचे माध्यमांतर डॉ.राजेंद्र थोरात – संस्कृती प्रकाशन ,पुणे.
३. मराठी साहित्य आणि चित्रपट कथा – डॉ.प्रविण महाजन,नागपूर.

K.S.M.S. ART'S & COMMERCE C. RAHU (PUNE)
PRINCIPAL
...t's & Commerce College
...ahu, Tal.Daund, Dist.Pune.

ISSN 2349-638x

Impact Factor 5.707

Shri Mahatma Basweshwar Education Society's

# Mahatma Basweshwar Mahavidyalaya, Latur

(NAAC Re-Accredited with 'A' Grade)

**One-Day National Conference**

**On**

# RESEARCH FRONTIERS IN GEOGRAPHY

**8th February, 2019**

Organized by

Department of Geography

(U.G., P.G. & Research Centre) and

Internal Quality Assurance Cell

In Collaboration With

*Marathwada Association of Geographers, Latur*

*and*

*Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded*

SPECIAL ISSUE OF
AAYUSHI INTERNATIONAL
INTERDISCIPLINARY
RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL

www.aiirjournal.com

EDITORS

Dr. N. G. Mali

Capt. Dr. B. M. Godbole

Dr. S. R. Dharashive

Dr. S. P. Dharne

Dr. S. M. Ijare

| Sr. No. | Name of the Researcher | Title of the Papers | Page No. |
|---|---|---|---|
| 98 | डॉ. प्रा. आर. डी. खाकरे<br>श्री. बन्सी रंगनाथ पाटोळे | ग्रामीण वस्त्यांचे प्रकार व प्रारूप एक भौगोलिक अभ्यास (केज तालुका) | 296 |
| 99 | प्रा.डॉ.शशिकांत तोळमारे | करू पर्यावरण संवर्धन, वसुंधरेचे होईल नंदनवन | 299 |
| 100 | डॉ.अभिजित आर.बादाडे<br>बळीराम शिवाजी लहाने | लातूर व औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचे प्रकारः एक भौगोलिक विश्लेषण | 304 |
| 101 | श्रीहरी रामराव गायकवाड<br>डॉ.सदानंद गोने | नांदेड जिल्ह्यातील दळणवळण सेवा : एक भौगोलिक अभ्यास | 307 |
| 102 | डॉ. सुनिता एस. शिंदे<br>दत्ता राधाकिसन शिंदे | परभणी जिल्ह्यातील लोकसंख्याचा अभ्यास | 309 |
| 103 | डी.एस.धावणे<br>डॉ.एस.एन. कळकसर | परभणी जिल्ह्यातील कृषी यांत्रिकीकरणाच्या स्तराचा तहसीलनिहाय भौगोलिक अभ्यास | 312 |
| 104 | प्रा.डॉ.नामदेव गजरे<br>प्रा.डॉ. गोरख माधवराव कोरे | नांदेड जिल्ह्यातील जलसिंचनाचा उत्पादनावरील प्रभावः एक भौगोलिक विश्लेषण | 314 |
| 105 | प्रा. डॉ. डी. एस. इटले<br>डॉ. आर. एस. भुरे | नैसर्गिक शेतीचे वाढते महत्त्व : एक भौगोलिक अभ्यास | 318 |
| 106 | डॉ.एम.पी.मानकरी<br>प्रा.एस.एच.गर्जे | लातूर जिल्हयातील भूजल पातळीचे भौगोलिक विश्लेषण | 321 |
| 107 | डॉ. सुरेश ज्यो. फुले<br>कु. स्वाती पटणे | रोस्टोच्या प्रतिमानातील विकास अवस्था : विशेष संदर्भ लातूर शहर, महाराष्ट्र | 323 |
| 108 | केरबा कांबळे<br>प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | लातूर जिल्ह्यातील यात्रा केंद्र व पर्यटनस्थळांचा अभ्यास | 326 |
| 109 | प्रा. एन. पी. मुसळे<br>प्रा.डॉ.बी.एस.राठोड | पर्यावरणीय समस्या व व्यवस्थापन | 328 |
| 110 | प्रा. व्हि. एन. सागावे<br>श्री. बालाजी रतन राठोड | बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या घनतेचा अभ्यास | 330 |
| 111 | प्रा. डॉ. जे.के.वाघमारे<br>प्रा. डी. व्ही. झिंजुर्डे | पर्यावरण प्रदुषण आणि मानवी आरोग्य : एक चिकित्सा | 333 |
| 112 | संगमेश्वर ज्ञानोबा भांगे<br>प्राचार्य डॉ.एस.एच.गोणे | नैसर्गिक आपत्ती आणि व्यवस्थापन : एक अभ्यास | 335 |
| 113 | प्रा.डॉ.अंबादास मारोतीराव मुळे<br>प्रा. डॉ. सुनिल धोंडीराम राठोड | राणीसावरगाव ग्रामवस्तीतील कृषी उत्पादनावरील हवामान बदलाच्या परिणामाचा भौगोलिक अभ्यास | 338 |
| 114 | प्रा. मोहन किसन शेलार<br>प्रा.डॉ.राजेश्वर ज्ञानोबा खाकरे | जलसंसाधन व्यवस्थापन - काळाची गरज | 340 |
| 115 | मुकुंद भाऊसाहेब<br>स्नेहा सदाशिव सूर्यवंशी | लातूर जिल्हयातील लोकसंख्या वितरणाचा चिकित्सक अभ्यास | 345 |
| 116 | प्रा. डॉ. आर. एस. धनुश्वर<br>गजानन पाटील | लातूर जिल्ह्यातील डाळ उद्योगांचा भौगोलिक अभ्यास | 347 |
| 117 | सुचिता बबनराव जाधव<br>डॉ. जे. के. वाघमारे | लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचा अभ्यास | 349 |
| 118 | प्रा. श्रध्दा विभूते<br>कु. प्रियंका रंगवाळ | भूगोलातील संशोधन पध्दतीत सुदूरसंवेदन तंत्राचा वापर | 353 |
| 119 | डॉ. ए. के. हांगे<br>प्रा. जी. आर. झाडके | मानवी आरोग्य व पर्यावरण | 356 |
| 120 | प्रा.डॉ. एन.के. वाघमारे<br>श्री बी ए मोतेराव | चाकूर तालुक्यातील लोकसंख्येच्या घनतेचा भौगोलिक अभ्यास। | 358 |

# जलसंसाधन व्यवस्थापन – काळाची गरज

प्रा.शेलार मोहन किसन
भूगोल विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय
राहू, ता.दौंड, जि.पुणे (महाराष्ट्र)

प्रा.डॉ. खाकरे राजेश्वर ज्ञानोबा
भूगोल विभाग प्रमुख
जयक्रांती कला व वाणिज्य महाविद्यालय
लातूर, जिल्हा-लातूर (महाराष्ट्र)

**सारांश :**

*पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या विविध नैसर्गिक साधन संपत्ती पैकी पाणी ही महत्वाची नैसर्गिक साधन संपत्ती आहे. पाणी हा मानवाच्या जीवनाचा आधार असून गावे, तालुके, जिल्हा, राज्य, देश इ. समृद्धी पाण्याच्या साठ्यावर अवलंबून असते. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांमध्ये जल साधन संपदेला महत्वाचे स्थान आहे. प्रस्तूत शोध निबंधात जल साधन संपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यास केला आहे. आधुनिक काळात जलव्यस्थापन हा एक ज्वलंत प्रश्न असून भारतातील ५ लाख खेड्यांपैकी ७५% खेडेगावात उन्हाळा ऋतूत पिण्याच्या पाण्याची समस्या जाणवते. अलीकडे ४-५ वर्षापासून पाणी समस्या हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जगातील ६.८ अब्ज लोकसंख्येपैकी १.२ अब्ज लोक पाणी टंचाईचा सामना करीत आहेत. आगामी ३० वर्षात जगातील १/३ लोकसंख्या ही पाण्याच्या शोधात असेल व भविष्यात पाण्यासाठी युद्ध होतील असा अंदाज युनिसेफ, जागतिक पाणी परिषद, तज्ञ व्यक्ती यांनी दिला आहे.*

*भारतात वस्तूंचे उत्पादन वाढत असताना जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची दरडोई उपलब्धता कमी-कमी होत आहे. १९४७ मध्ये प्रत्येक व्यक्तीमागे उपलब्ध असणारे ६ हजार घनमीटर पाणी आज २ हजार घन मीटर पर्यंत कमी झाले आहे. त्यामुळे जल साधन संपत्तीचे काळजीपुर्वक व्यवस्थापन करणे ही एक काळाची गरज बनली आहे.*

*सदर शोध निबंधात पाण्याची उपलब्धता, पाण्याचे महत्व, वैशिष्ट्ये, जागतिक व राष्ट्रीय पातळीवर पाण्याची सध्य स्थिती, पाण्याचा वापर, पाणी व्यवस्थापनासाठी उपाय इ. विविध बाबींवर चर्चा केली आहे.*

**बीज संज्ञा :** साधन संपदा, जलसाधन संपदा, जल व्यवस्थापन इ.

**प्रस्तावना :**

निसर्गाने मानवाला जलसंपदा ही अमुल्य अशी देणगी बहाल केली आहे. पृथ्वीचा ७१% भाग (३६१ दशलक्ष चौ.कि.मी.) भाग जलभागांनी/महासागर-समुद्र यांनी व्यापला आहे. जगाची वाढती लोकसंख्या, महानगरे, औद्योगिकरण यामुळे पाणी टंचाई निर्माण होत आहे. पाण्याची उपलब्धता व त्यासाठी मोजावी लागणारी किंमत कमी असल्याने पाण्याच्या अतिरेकी वापर केला जातो. जनमाणसात पाणी बचतीची सवय जो पर्यंत होत नाही तोपर्यंत पाणी टंचाई समस्या सोडविणे कठीण आहे. पाणी व्यवस्थापनातून एखादे राष्ट्र किती प्रगती करु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ईस्त्राईल देश होय. आपणाकडे इस्त्राईल सारखी अवर्षणग्रस्त परिस्थिती नसली तरी वाढते नागरी करण, औद्यगिकरण, लोकसंख्या वाढ, शेती करण्याच्या पद्धती यामुळे जल व्यवस्थापन करणे काळाची गरज वाटते.

**उद्दिष्ट्ये :**

१. जल साधन संपदेची उपलब्धता, सध्यस्थिती व महत्व यांचा आढावा घेणे.
२. जलसाधन संपदा व्यवस्थापनाच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.
३. जल व्यवस्थापनासाठी उपाय योजना सूचविणे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने द्वितीय माहिती स्त्रोताचा वापर केला आहे. ती माहिती संदर्भग्रंथ, मासिके, दैनिकवर्तमानपत्रे, सामाजिक आर्थिक, सामालोचन अहवाल इ. मधून मिळवली आहे. व या माहितीचा उपयोग करुन निष्कर्ष काढले आहेत.

**संकल्पना व व्याख्या :**

१. मानवाच्या कार्यक्षेत्रांशी संबधित असणाऱ्या सर्व जैविक व अजैविक घटकांना साधन संपदा असे हणतात.
२. जॅकी स्मिथ - मानवाला उपयोगी पडणारे पर्यावरणातील घटक म्हणजे सा. संपदा होय.

**जल साधन संपदा :**

पाणी म्हणजे जल होय. इंग्रजी भाषेत त्याला **Water** असे म्हणतात **Water** हा इंग्रजी भाषेतील शब्द लॅटीन भाषेतील व्यॉरी शब्दापासून तयार झाला आहे. तर व्यॉरी हा लॅटीन शब्द वारी या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे. पाणी या शब्दासाठी जल, उदक, तिर्थ, जीवन, निर इ. समान अर्थाचे शब्द आहेत.

२१ व्या शकतकात जल हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन बनले असून पाण्याशिवाय जीवन, प्रगती करता येत नाही. पाण्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी त्याचे व्यवस्थापन करणे काळाची गरज आहे. पृथ्वीचा ७०.७८ % भाग पाण्याने व्यापला

असून महासागर, सरोवरे, तलाव, धरण, कालवे, विहिरी, नद्या, हिमनद्या, आदि इ. जलस्रोत आहेत. जलसंपदा ही पुनर्नवीकरणीय साधन संपदा असून जलचक्रामुळे ती टिकून आहे.

**जल साधन संपदाचे प्रकार :**

१. **भू-पृष्ठीय जल सा. संपदा** - भू-पृष्ठावरून वाहणाऱ्या पावसाच्या पाण्याला जलौघ असे म्हणतात. भू-पृष्ठीय जल हे महासागर, सरोवरे, तलाव, नद्या, कालवे, विहिरी इ. स्वरूपात आढळते.

२. **भू-जल सा.संपदा-**

जमिनीच्या/भूमीच्या खोल अंतर्गत भागात आढळणाऱ्या जल साठ्यांना भूजल असे म्हणतात.

पावसाळा ऋतूत ही पातळी वर तर उन्हाळा ऋतूत ती खोल जाते.

**पृथ्वीवरील जलसाधन संपदेची उपलब्धता :**

पृथ्वीच्या एकूण ३१ कोटी चौ.कि.मी. क्षेत्रफळापैकी ६९.०७% जल व ३०.०३ % भूमी आहे. अमेरिकन जलतज्ञ वुल्मन यांच्या मते पृथ्वीवर जे जल उपलब्ध आहे. त्यापैकी ९७.५ % महासागरात २ % उत्तर व दक्षिण ध्रुवावर बर्फाच्या स्वरूपात तर ०.५ % पाणी शुद्ध व पिण्यासाठी योग्य आहे.

**तक्ता क्र.१ जग जल वितरण**

| अ.क्र. | वितरण | टक्का |
|---|---|---|
| १ | सागरजल | ९७.४ % |
| २ | बर्फाच्छादित जल | १.९८% |
| ३ | भूमिगत जल | ०.६०% |
| ४ | नद्या, नाले | ०.००१% |
| ५ | प्राणी, वनस्पती, वातावरण | ०.००३% |
| ६ | मृदा, आर्द्रता | ०.००५% |
| ७ | तळी, सरोवरं | ०.००३% |
| | एकूण | १००% |

पृथ्वीच्या एकूण जलापैकी ९७.४ % जल हे खारे असून केवळ २.६ % पाणी गोड आहे. या गोड्या पाण्यापैकी १.९८ % पाणी बर्फाच्या स्वरुपात असून केवळ ०.६२ % पाणी सजीव सृष्टीला वेगवेगळ्या मार्गाने उपलब्ध होते.

जल हे पृथ्वीवरील पुनर्नवीकरणीय किंवा अविनाशी संपदा असून ही वाढती लोक संख्या, नागरीकरण, औद्योगिकरण, जल प्रदुषण यामुळे स्थानिक, प्रादेशिक व जागतिक स्तरावर जल व्यवस्थापन ही समस्या निर्माण झाली आहे.

**तक्ता क्र. २ देश व जलाचा विविध क्षेत्रातील वापर**

| अ.क्र. | देश | विविध क्षेत्रातील जलवापर टक्केवारी | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | शेती क्षेत्र | उद्योग | घरगुती वापर | |
| १ | भारत | ७३ | २१ | ६ | १०० |
| २ | अमेरिका | ३४ | ५७ | ९ | १०० |
| ३ | जपान | २९ | ६१ | १० | १०० |
| ४ | चीन | ६७ | २५ | ०८ | १०० |

भारतात सर्वात जास्त वापर हा शेतीसाठी असून नंतर उद्योग व घरगुती वापरासाठी वापरले जाते. जलाची उपलब्धता विचारात घेता पावसाच्या बाबतीत भारत हा श्रीमंत देश असून अमेरिका, कॅनडा या देशाच्या १.५ पट तर ऑस्ट्रेलियाच्या २.५ पट पाऊस भारतात पडतो. पाण्याच्या अतिवापर, साठवणूकीची कमी क्षमता, जल व्यवस्थापनाचा अभाव इ. कारणामुळे जल तुटवडा जाणवतो.

**जल साधन संपदेची वैशिष्ट्ये :**

मानवी जीवनासाठी जल ही साधन संपदा अनमोल असून त्याची किंमत सोने, चांदी यापेक्षा ही अधिक आहे. सध्या पृथ्वीवर सर्वात उपयुक्त व विपुल अशी जल साधन संपदा आहे. जल साधन संपदेची काही महत्वपुर्ण वैशिष्ट्ये आहेत.

१. पृथ्वीवर २/३ भाग जल आहे.
२. मानवी शरीरात ७० % पाणी आढळते
३. फळे/भाजीपाला यात ९० % तर मांसा मध्ये ४०% पाणी असते.
४. पृथ्वीवर पाणी हा एकमेव असा घटक आहे की, तो द्रव घन व वायू अशा तीन रुपात आढळतो.
५. पाण्याची उष्णता साठवून ठेवण्याची क्षमता सर्व द्रव्य पदार्थांच्या तुलनेत अधिक आढळते.

६. जल गोठल्यानंतर त्यातील क्षार पदार्थ बाहेर टाकते.

जल हे वरील विविध वैशिष्ट्यांनी परिपुर्ण असल्यामुळे ते आर्थिक विकासाचे प्रमुख साधन बनले आहे. जल सा.संपदेची निर्मिती करणे अशक्य असून पाण्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी त्याचे व्यवस्थापन करणे काळाची गरज आहे.

**जागतिक पातळीवर जल साधन संपदा सद्यः स्थिती :**

१. पर्यावरण व त्यांच्या मते येत्या शतकात पृथ्वीचे तापमान २.५ ते ६ सेल्सिअस पर्यंत वाढणार असून त्यामुळे पाणी टंचाई अधिक जाणवेल.
२. जागतिक जल उपलब्धता फार विषम आढळते.
३. जागतिक पाणी परिषदेच्या मते सद्या जागतिक पातळीवर ६६०० घन मीटर पाणी उपलब्ध असून ते २०२५ अखेर ४८०० घनमीटर इतके कमी होईल.
४. सन १९९५ मध्ये जगातील ३५ % लोक पाणी टंचाईचा सामना करीत होते. सन २०२५ अखेर हे प्रमाण ५९ % पर्यंत वाढेल.
५. आज जलजन्य आजार व पाणी टंचाई यामुळे जगात दररोज १५ ते १८ हजार लोक मृत्यूमुखी पडतात.
६. जगातील एकूण आजारापैकी ८० % आजार व ३३ % मृत्यू हे दूषित जलामुळे घडून येतात.
७. जगातील गरीब व अविकसीत देशातील स्त्रियांचे १/३ आयुष्य पाणी भरण्यात खर्च होते.
८. जगात पाण्यामुळे संघर्ष/वाद निर्माण होत आहेत.

**भारतातील जल साधन संपदेची सद्यः स्थिती :**

१. भारतात सर्व साधारण वर्षभरात ११७० मी.मी. पाऊस पडतो परंतु त्याचे प्रमाण एक सारखे नाही. उदा: पश्चिमेकडील वाळवंटात हे प्रमाण १०० मि.मि. तर ईशान्य भारतात १५००० मि.मि. आहे.
२. भारतात वाळवंटात वर्षभरात ५-७ दिवस, ईशान्य भारतात १२५-१४० दिवस तर इतरत्र ८ ते ८० दिवस कमी अधिक प्रमाणात पाऊस पडतो.
३. भारताला दरवर्षी ४ हजार अब्ज घनमीटर पाणी मिळते.
४. भारतीय स्त्रीला आज ही शुद्ध पाणी मिळविण्यासाठी काही ठिकाणी सरासरी दररोज ४ कि.मी. पायपीट करावी लागते.
५. शुद्ध पाणी मिळत नाही म्हणून दरवर्षी ६ अब्ज लिटर पेक्षा अधिक बाटली बंद पाण्याची विक्री होते.
६. केवळ मुंबई शहरात वाहने धुण्यासाठी दररोज ५० लाख लिटर पाण्याचा उपव्यय केला जातो.
७. इस्त्राईल या देशात १० से.मी. इतका सरासरी पाऊस पडत असून भारतात ही सरासरी ५० सें.मी. आहे. इस्त्राईल धान्य उत्पादनात स्वंयपुर्ण तर भारतात कुपोषण व धान्य तुटवडा ही समस्या जाणवते.

भारतीय शेती, पाण्याची उपलब्धता, विजेचे उत्पादन आणि एकूण अर्थ व्यवस्थेसाठी पर्जन्य हा महत्वाचा घटक आहे.

**भारतातील जल व्यवस्थापन समस्या :**

जल व्यवस्थापनासाठी खालील समस्या जबाबदार आहेत.

१. **राजकीय दृष्टीकोन :-** जल व्यवस्थापनासाठी राजकीय उदासिनता प्रामुख्याने जबाबदार आहे. आज अनेक राज्यात पाणी वाटपा संदर्भात समस्या असून स्थानिक, प्रादेशिक जलवाद निर्माण झाले आहेत.
२. **पाण्याचे विषम वितरण :-** भारतात सर्व साधारण ११०० ते १४०० मी.मी. पाऊस जून ते सप्टेंबर या काळात कमी अधिक प्रमाणात पडतो. तर थरच्या वाळवंटात १० मी.मी. तर चेरापूंजी येथे १५०० मी.मी. पाऊस पडतो. त्यामुळे पाणी समस्या निर्माण होते.
३. **वाढती लोकसंख्या :-** भारताचा चीन नंतर लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. वाढत्या लोकसंख्ये बरोबर पाण्याचा वापर वाढतो. परंतु उपलब्ध पाण्याच्या टंचाईमुळे दरडोई कमी पाणी वापरावे लागते. उदा. अमेरिकेत दरडोई दररोज ५०० ते २००० लिटर तर जपान मध्ये दररोज ३०० ते ५०० लिटर तर भारतात हे प्रमाण ५० ते १०० लीटर आहे.
४. **नागरीकरणाचा वाढता वेग :** ग्रामीण भागापेक्षा नागरीभागात रोजगाराच्या जास्त संधी असल्यामुळे अधिक लोक शहराकडे स्थलांतर करतात. १९५१ तध्ये ग्रामीण भागात ८२ % तर शहरी भागात १८ % लोक राहत होते. २००१ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ६८ % व ३२% झाले.
५. **जंगलाचे कमी होणारे क्षेत्र :-** नागरी करणाच्या वाढत्या वेगामुळे औद्योगिक वसाहती, शेती, रस्ते, धरणे, रेल्वे इ.मुळे जंगल क्षेत्र कमी होत आहे.
६. **शेतीसाठी पाण्याचा वाढता वापर :-** भारत शेतीप्रधान देश असल्यामुळे जवळपास ७० % पाणी हे शेती साठी वापरले जाते. व एकूण लोकसंख्येपैकी ६८ % लोक शेतीवर अवलंबून आहेत.

७. **पाण्याचा औद्योगिक क्षेत्रासाठी वाढता वापर :-** शेतीनंतर पाणी वापरासाठी औद्योगिक क्षेत्राचा क्रमांक लागतो. उत्पादन प्रक्रिया, स्वच्छता, इ.साठी पाणी वापरले जाते.
उदा: साखर उद्योग, लोहपोलाद, साबन उद्योग, चामडी इ.

८. **जनावरांसाठी पाणी वापर :-** जनावरांना जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागते. प्रत्येक जनावराची पाण्याची गरज वेग-वेगळी आहे. उदा: गाई, म्हशींना दररोज २० ते ४० लीटर पाणी लागते. तर भारताच्या जनावरांच्या संख्येत जगात दुसरा क्रमांक लागतो.

९. **स्थलांतर :-** महाराष्ट्रातून विशेषता विदर्भ, मराठवाड्यातील प्रामुख्याने लातूर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, जालना, परभणी इ.जिल्ह्यातून पाणी टंचाईच्या काळात हजारो लोक मुंबई, पुणे शहराकडे स्थलांतर करतात.

१०. **जल सिंचन व जलप्रदुषण :-** आधुनिक काळात शेतीसाठी पाण्याचा केला जाणारा अतिरिक्त वापर क्षारीकरणाची क्रिया रासायनिक खते, जंतुनाशके, किटकनाशके यांच्या वाढत्या वापरामुळे पाण्याची गुणवत्ता कमी होऊन प्रदुषणात वाढ झाली आहे.

११. **त्याज्य पदार्थांचे वाढते प्रमाण :-** सांडपाणी, मलमूत्र, प्लॅस्टिक, कारखान्यातील अपद्रव्ये इ.मुळे प्रदुषण वाढत आहे.

**जल साधन संपदेचे व्यवस्थापन :**

उपलब्ध जल स्त्रोतांचा काळजी पुर्वक वापर करुन उपलब्ध जलसाठा आणि त्याचा दर्जा यांचे संवर्धन करणे म्हणजे जलव्यवस्थापन होय.

भारतातील पाणी टंचाई ही पाणी वापरण्याची चुकीची पद्धती, दूरदृष्टीचा अभाव इ.मुळे निर्माण झाली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात जल व्यवस्थापन गुणवत्तावाढीसाठी उपाय योजना येतील.

**१. घरगुती/वैयक्तिक स्तरावरील पाणी व्यवस्थापन :-**

आपल्याकडे भौतिक सुविधांचा अतिरेकी वापर करुन पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय केला जातो. वाहत्या नळांखाली कपडे धुणे, शॉवर खाली आंघोळ करणे, वाहत्या पाईपद्वारे गाडी धुणे, शौचालयात प्लॅशचा वापर यामुळे पाण्याची किमान ३ पट नासाडी होते.

**घरगुती व वैयक्तिक जल वापरताना खालील उपाययोजना करणे आवश्यक ठरते.**

१. शॉवरचा वापर न करता आंघोळ करताना बादलीचा वापर करणे.
२. शौचालयात प्लॅशचा वापर न करता बादलीचा वापर करणे.
३. दात घासणे, दाढी करणे या साठी नळाचा वापर न करता मगात पाणी घेऊन त्याचा वापर करणे.
४. गळके नळ, पाईप यांची दुरुस्ती करणे.
५. वाहत्या नळाखाली कपडे न धुता बादलीचा वापर करणे.
६. गाडी धुणेसाठी वाहत्या नळाचा वापर न करता कपडा बादलीत बुडवून गाडी स्वच्छ करणे.
७. दात धुण्यासाठी नळाचा वापर न करता मगाचा वापर करणे
८. झाडांना व हिरवळीला पाणी सकाळी किंवा रात्री देणे यामुळे बाष्पीभवन कमी होते.
९. स्थानिक स्वराज्य संस्था, महानगर पालिका, क्षेत्रात पाणी वापरासाठी मीटर बसविणे.
१०. हॉटेल्स, रेस्टॉरंट, सिनेमागृह, शॉपिंग मॉल्स इ. सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी छोटे ग्लास वापरणे. तसेच वॉश बेसिनच्या जागेवर प्रेस बटन असलेल्या तोट्या बसविणे.
११. साठविलेले पाणी ओतून न देता त्याचा वापर करणे.
१२. साठवण टाकीतील पाणीपुरवठा टाकी भरताच तात्काळ बंद करणे.
१३. वृक्षांना पाणी न फवारता झाडांच्या मुळांना पाणी देणे.
१४. कपडे व भांडी धुण्यासाठी साबनाचा कमी वापर करणे

वरील प्रमाणे घरगुती उपाय योजना केल्यास एक व्यक्ती एका दिवसाला किमान १४५ लीटर तर एक कुटूंब १००० लीटर पाणी सहज वाचवू शकतो.

**कृषी जलव्यवस्थापन :**

भारतात सर्वात जास्त पाणी वापर शेतीसाठी केला जातो. सुधारित जलसिंचनामुळे २०.३० % पाण्याची बचत होते. यासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक ठरते.

१. शेतीसाठी पिकांना पाणी देण्याचे शास्त्रीय ज्ञान शेतकऱ्यांना देणे.
२. शेतकऱ्यांनी ऊस, केळी, संत्रे या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्यावर येणारी नगदी पिके घेणे.
३. शेतीस पाणी देण्यासाठी परांपरागत पद्धतिचा वापर न करता ठिबक सिंचन, समतल चर, शेततळे इ. पद्धतींचा वापर करावा.

४. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविण्यासाठी मृदासंधारण, जलसंधारण, पाणी आडवा पाणी जिरवा इ. उपक्रम राबविणे.
५. नवीन धरण प्रकल्प इ. मंजूरी देताना सामाजिक, आर्थिक पर्यावरणावर होणारा परिणाम इ. फायदा-तोटा विचारात घेऊन प्रकल्पांना मान्यता देणे.
६. लोक सहभागातून स्थानिक पातळीवर जल व्यवस्थापनाचे विविध उपक्रम हाती घेणे. उदा:. ग्रामपंचायत, नगरपालिका, सामाजिक संस्था इ.
७. विहिरी, बोरवेल इ. मधून पाण्याचा उपसा मर्यादित करणे किंवा उद्योगासाठी वापरणे
८. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पूर व्यवस्थापन यामुळे ही पाण्याची समस्या कमी होईल.

वरील विविध उपाय योजल्यास जल व्यवस्थापन सहज शक्य होईल.

## निष्कर्ष व उपाय योजना :

१. भारतात जलसंपदा भरपूर असून ही जलसंवर्धन, नियोजन यांचा अभाव असल्यामुळे एकूण पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी १० % पाणीच केवळ वापरले जाते.
२. भारतातील पावसाचा कालखंड, वितरण व प्रमाण यात मोठी विषमता असल्याने संपुर्ण भूजलाचे संवर्धन व व्यवस्थापन करणे अशक्य आहे.
३. वर्षभरात पडणाऱ्या एकूण पावसाच्या पाण्यापैकी खेड्यात प्रत्यक्षात पुनर्भरणाचे सरासरी प्रमाण १३ % तर शहरी भागात हे प्रमाण ३ % इतके कमी आहे.
४. शुद्ध पाणी मिळत नाही म्हणून दरवर्षी ६ अब्ज लीटर पेक्षा अधिक बाटली बंद पाण्याची विक्री केली जाते. व दिवसेन दिवस हे प्रमाण वाढत आहे.
५. दरवर्षी कूपनलिका, विहिरी यांच्या वाढत्या प्रमाणामुळे भूजल पातळी खालावत आहे.
६. प्रत्येक गावात एक पाणी समिती स्थापन करून दरवर्षी पावसाळ्या नंतर गावात किती पाणी उपलब्ध आहे. प्रत्येक कुटूंबाच्या वाट्याला किती घनमीटर पाणी उपलब्ध होऊ शकते व गावात वर्षभरात कोणती पिके घ्यायची याची जबाबदारी प्रत्येक कुटूंबावर सोपवावी.
७. शासनाची जलयुक्त शिवार अभियान ही योजना दुष्काळी गावांसाठी वरदान ठरत आहे.
८. नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका क्षेत्रात पाणी गळती, बेकायदा नळजोड, पाणी वापरासाठी मीटर पद्धतीचा वापर करणे, सांडपाण्याच्या प्रक्रिया करुन पुनर्रवापर करणे आवश्यक असून पाण्याचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.
९. जलसाधन संपत्तीला भविष्यात सोन्यासारखी किंमत येणार असल्यामुळे तिचा वापर काटकसरीने करणे आवश्यक आहे.
१०. जलसाक्षरता व जनजागृती करणे आवश्यक आहे.
११. शासनाने शहरांची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन शहरांसाठी स्वतंत्र धरणांची निर्मिती करावी
१२. राष्ट्रीय पेयजल योजनेचा अधिक विस्तार करणे.
१३. देवास पॅटर्न सर्व खेड्यापर्यंत पोहचविणे
१४. पाणी फाऊंडेशन, नाम या सारख्या सामाजिक काम करणाऱ्या संस्थाची संख्या वाढविणे.

## संदर्भ ग्रंथ :


१. पर्यावरण शास्त्र - प्रा.डॉ.टी.एन.घोलप, निरिकांत प्रकाशन पुणे
२. पर्यावरणीय अध्ययन - प्रा.अरुण सवदी, कोळेकर, जोशी, निराली प्रकाशन पुणे
३. पर्यावरणीय जाणीव जागृती - प्रा.डॉ.डी.एन. खैरनार, वर्षा प्रकाशन पुणे
४. योजना मासिक - जुलै २०१०, वर्ष ३७ अंक १२
५. योजना मासिक - जुलै २०१२ वर्ष ३९ अंक १२
६. लोकराज्य मासिक - ऑगस्ट २०११, ६३ अंक ५
7. *Water shade management issues & policies for 21st century – K. Palani Swami and Suresh Kumar.*
8. *Water Environment in India – N.L Gupta and Laxmi Pati Shukla, Roopa publication House Jaipur*
9. *Geography of Resource's – Dr. B.S. Negi Kedarnath Ramnath publication Delhi.*

४. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविण्यासाठी मृदासंधारण, जलसंधारण, पाणी आडवा पाणी जिरवा इ. उपक्रम राबविणे.
५. नवीन धरण प्रकल्प इ. मंजूरी देताना सामाजिक, आर्थिक पर्यावरणावर होणारा परिणाम इ. फायदा-तोटा विचारात घेऊन प्रकल्पंना मान्यता देणे.
६. लोक सहभागातून स्थानिक पातळीवर जल व्यवस्थापनाचे विविध उपक्रम हाती घेणे. उदा:. ग्रामपंचायत, नगरपालिका, सामाजिक संस्था इ.
७. विहिरी, बोरवेल इ. मधून पाण्याचा उपसा मर्यादित करणे किंवा उद्योगासाठी वापरणे
८. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पूर व्यवस्थापन यामुळे ही पाण्याची समस्या कमी होईल.

वरील विविध उपाय योजल्यास जल व्यवस्थापन सहज शक्य होईल.

**निष्कर्ष व उपाय योजना :**

१. भारतात जलसंपदा भरपूर असून ही जलसंवर्धन, नियोजन यांचा अभाव असल्यामुळे एकूण पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी १० % पाणीच केवळ वापरले जाते.
२. भारतातील पावसाचा कालखंड, वितरण व प्रमाण यात मोठी विषमता असल्याने संपुर्ण भूजलाचे संवर्धन व व्यवस्थापन करणे अशक्य आहे.
३. वर्षभरात पडणाऱ्या एकूण पावसाच्या पाण्यापैकी खेड्यात प्रत्यक्षात पुनर्भरणाचे सरासरी प्रमाण १३ % तर शहरी भागात हे प्रमाण ३ % इतके कमी आहे.
४. शुद्ध पाणी मिळत नाही म्हणून दरवर्षी ६ अब्ज लीटर पेक्षा अधिक बाटली बंद पाण्याची विक्री केली जाते. व दिवसेन दिवस हे प्रमाण वाढत आहे.
५. दरवर्षी कूपनलिंका, विहिरी यांच्या वाढत्या प्रमाणामुळे भूजल पातळी खालावत आहे.
६. प्रत्येक गावात एक पाणी समिती स्थापन करुन दरवर्षी पावसाळ्या नंतर गावात किती पाणी उपलब्ध आहे. प्रत्येक कुटूंबाच्या वाट्याला किती घनमीटर पाणी उपलब्ध होऊ शकते व गावात वर्षभरात कोणती पिके घ्यायची याची जबाबदारी प्रत्येक कुटूंबावर सोपवावी.
७. शासनाची जलयुक्त शिवार अभियान ही योजना दुष्काळी गावांसाठी वरदान ठरत आहे.
८. नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका क्षेत्रात पाणी गळती, बेकायदा नळजोड, पाणी वापरासाठी मीटर पद्धतीचा वापर करणे, सांडपाण्याच्या प्रक्रिया करुन पुन्नर्वापर करणे आवश्यक असून पाण्याचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.
९. जलसाधन संपत्तीला भविष्यात सोन्यासारखी किंमत येणार असल्यामुळे तिचा वापर काटकसरीने करणे आवश्यक आहे.
१०. जलसाक्षरता व जनजागृती करणे आवश्यक आहे.
११. शासनाने शहरांची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन शहरांसाठी स्वतंत्र धरणांची निर्मिती करावी
१२. राष्ट्रीय पेयजल योजनेचा अधिक विस्तार करणे.
१३. देवास पॅटर्न सर्व खेड्यापर्यंत पोहचविणे
१४. पाणी फाऊंडेशन, नाम या सारख्या सामाजिक काम करणाऱ्या संस्थाची संख्या वाढविणे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. *पर्यावरण शास्त्र - प्रा.डॉ.टी.एन.घोलप, निशिकांत प्रकाशन पुणे*
२. *पर्यावरणीय अध्ययन - प्रा.अरुण सवदी, कोळेकर, जोशी, निराली प्रकाशन पुणे*
३. *पर्यारणीय जाणीव जागृती - प्रा.डॉ.डी.एन. खैरनार, वर्षा प्रकाशन पुणे*
४. *योजना मासिक - जुलै २०१०, वर्ष ३७ अंक १२*
५. *योजना मासिक - जुलै २०१२ वर्ष ३९ अंक १२*
६. *लोकराज्य मासिक - ऑगस्ट २०११, ६३ अंक ५*
7. *Water shade management issues & policies for 21st century – K. Palani Swami and Suresh Kumar.*
8. *Water Environment in India – N.L Gupta and Laxmi Pati Shukla, Roopa publication House Jaipur*
9. *Geography of Resource's – Dr. B.S. Negi Kedarnath Ramnath publication Delhi.*


PRINCIPAL
Art's & Commerce College
Rahu; Tal: Daund, Dist. Pune

# REVIEW OF RESEARCH

UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal

**ISSN 2249-894X**

**Impact Factor: 5.7631 (UIF)**

**UGC Journal Number: 48514**

**UGC List Number: 1232**


# Maharashtra : History, Culture & Society




Editor
Dr. Devidas Waydande

Editor-in-Chief
Dr. Ashok Yakkaldevi



K.S.M'S. ART'S & COMMERCE COLLEGE ★ RAHU (PUNE)

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 35 | वीरगळ एक स्मृतीशिल्प<br>वैभव साळुंखे | 150 |
| 36 | मध्ययुगीन समतानायक महात्मा बसवण्णा आणि अस्पृश्यता निर्मूलन<br>प्रा. मांजे विजयकुमार प्रल्हादराव | 153 |
| 37 | महाराष्ट्रातील कातकरी समाज व संस्कृती : एक अभ्यास<br>प्रा.विकास भानुदास टकले | 157 |
| 38 | कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे १९३७ च्या निवडणुकीतील योगदान<br>प्रा. डॉ. वाघमारे विष्णू बबुवान | 161 |
| 39 | फलटणमधील महानुभाव पंथीय श्रीकृष्ण मंदिरः एक आढावा<br>योगिता रवींद्र मठपती | 165 |
| 40 | नसीमा हुरजूक यांचे दिव्यांगासाठी योगदान<br>श्री युवराज आनंदा मिठारी | 167 |



K.S.M'S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

Scanned by CamScanner

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# महाराष्ट्रातील कातकरी समाज व संस्कृती : एक अभ्यास

प्रा.विकास भानुदास टकले
इतिहास विभाग प्रमुख , कला व वाणिज्य महाविद्यालय,राहू.

## १. प्रस्तावना



महाराष्ट्रामध्ये २३ मे २००६ च्या शशासकीय राजपत्रानुसार ३७ भटक्या जमाती व १४ विमुक्त जाती आहेत. या जाती जमातींच्या पोटजमातींची संख्या २०० पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृती, रूढी, परंपरा संस्कृतीक कार्यक्रम, विवाह पध्दती, अंधश्रध्दा, अत्यंविधी, व्यवसाय, भौगोलीकता, इत्यादी कारणांनी त्यांच्यात वैविध्य आढळते. हा भटका समाज अनेक वष्वर्षापासून महाराष्ट्राच्या खेडयापाडयात आणि शहरात उपजिविकेच्या निमित्ताने भटकत आहे. त्यामध्ये शिकार करून उपजिविका करणारे ,जनावरे पाळून त्यांची खरेदी विक्री करणारे, पारंपारीक कलेंच्या आधारे लोकांचे मनोरंजन करून जगणारे, हस्तरेषा भविष्य सांगणारे, गावाच्या आधारे भिक्षुकी करणारे, घरोघर भिक्षा मागून जगणारे, धार्मिक विधी कार्य करणारे आणि कष्टाची कामे करून उपजीवीका करणाऱ्या भटक्या विमुक्त जातींचा समावेश आहे. यापैकी एक समाज म्हणजे कातकरी समाज होय. महाराष्ट्राच्या सहयाद्रीच्या डोंगररांगामधून राहाणारी एक वन्य जमात म्हणून कातकरी समाज ओळखला जातो. कातकरी समाजाला कातकरी, काथेडी, कातोडी, काठोडी, कायकरी, कथेडीया इत्यादी नावाने ओळखले जाते [१].

## २. कातकरी समाजाचे वस्तीस्थान

कातकरी समाज हा खऱ्या अर्थाने आरण्यवासी समाज आहे. गावापासून दूर नदीकाठी अगर डोंगरकपारीत त्यांची वसाहत असते. या वसाहतीला 'कातवाडी' असे म्हटले जाते. एका कातवाडीत १५ ते ५० चंद्रमौळी झोपडया असतात. कुलाबा, ठाणे, पुणे, नाशिक या जिल्ह्यांमध्ये कातकरी समाजाचे वास्तव्य आहे[२]. सन १९६१ च्या जनगननेनुसार कातकरी समाजाची लोकसंख्या १,४३,२५५ होती. तर सन २०११ च्या जनगननेनुसार भरतातील कातकरी समाजाची लोकसंख्या ३,१४,००० ऐवढी आहे, तर महाराष्ट्रामध्ये कातकरी समाजाची लोकसंख्या२,८६,०००ऐवढी आहे.[३]

## ३. कातकरी समाजाच्या पोटजाती

कातकरी समाज हा दोन वर्गामध्ये विभागला गेला आहे.

१. ढोर कातकरी

२. मराठे किंवा सोन कातकरी

त्याचबरोबर कातकरी समाजात अथावर, धेड, सिंधी, सोन, वरप असे पोटविभाग आहेत.

K.S.M'S. ART'S & COMMERCE ... RAHU (PUNE)

४. शरिररचना

कातकरी समाज हा जंगलात रहात असल्यामुळे तो गरीब आहे. हातातोंडाची गाठ पडेल की नाही याची शाश्वती नाही. या समाजाच्या लोकांची प्रकृती आणि शारिरीक अवस्था खालावल्यासारखी दिसून येते. तरूण वयात कातकरी समाजातील स्त्री–पुरूष दनकट,ताकतवान आणि काटक असले तरी, या दोघांचीही प्रकृती वय वाढल्यानंतर चटकन खालावते. कातकरी समाजातील लोक गहूवर्णीय किंवा कृष्णवर्णीय असतात. त्यांच्या कांतीवर काही वेळा लकाकी असते. त्यांचे डोळे खोल असतात. नाकाचे हाड बसके असते. ओठ जाड असतात. पुरूष आणि स्त्रीया या दोघांचेही केस कुरूळे असतात. कातकरी हा वर्णाने काळा, मध्यम उंचीचा, पिंगट काळया व विरळ केसांचा सरळ व उंच व किंचित पुढे असलेल्या कपाळाचा, दबलेल्या अशा सरळ किंवा पसरट नाकाचा, रूंद तोंडाचा, लहान हनुवटीचा, सडपातळ रेखीव असा असतो. तो अंत्यत बळकट व चिवट असतो. स्त्रिया उंच व सडपातळ असून त्यांचे केस क्वचित विंचारलेले असतात. मुले हडकुळी असतात.[६]

५. कातकरी समाजाची वेशभुषा व केशभुषा

कातकरी समाजातील स्त्री–पुरूषांचे केस कुरूळे असतात. पुरूषांच्या अंगावर लंगोटी व डोक्यावर एक फडके बांधलेले असते. कर्फा किंवा फाटलेली बंडी कधीतरी काहींच्या अंगावर असते. कधी एखादे घोंगडेही खांदयावर असते. सोने कातकरी जमातीची डोकी भादरलेली असतात. तर ढोर कातकरी कधीही डोके भादरत नाहीत. केसांना मागे गाठ मारलेली असते. कातकरी समाजातील स्त्रियांच्या अंगावर घट्ट नेसलेली कासोटयाची साडी असते आणि खांदयावर पदर असतो. काही स्त्रीया डोक्यावरही पदर घेतात. फक्त सणवार असेल तरच स्त्रिया अंगात चोळी घालतात. त्यांच्या गळयात रंगित मण्यांची पोत असते. सोन कातकरी स्त्रिया हातात पितळी व काचेच्या बांगडया घालतात. त्याचप्रमाने इतर दागिने म्हणजे पितळी वाक्या, बुगडया आणि काप परिधान करतात. त्याचबरोबर केसांच्या आंबाडयावर पितळी गुंडी लावतात. स्त्रिया आपल्या हातावर गोंदवून घेत नाहीत. ढोर कातकऱ्यांच्या स्त्रिया फक्त काचेच्या बांगडया घालतात. हातावर गोंदवून घेतात.लहान आकाराची बाळी घालतात.सोने कातकरी स्त्रियांच्या पायात काही नसते. तर ढोर कातकरी स्त्रिया पायात पितळी साखळया घालतात.स्त्रियांना काचमण्यांच्या माळा, पोती, बांगडया व कर्णभूषणे घालण्याची फार हौस असते. कुमारीका गळयात रंगित पोत घालतात. सुवासिनी स्त्रिया गळयात काळी पोत व पायात जोडवी घालतात. काही स्त्रिया कपाळावर हनुवटीवर व हातावर गोंदवून घेतात. स्त्रिया गुंजाच्या माळा घालतात. कानाच्या पाळयांना मोठी छिद्रे पाडून त्यात साखळयाही घालतात.[७]

६. कातकरी समाजाचा व्यवसाय

सोन कातकरी ढोर कातकरी समाजापेक्षा जास्त प्रमाणात स्थिरावलेले असून ते शेतमजुरीची कामे करतात. इतर कातकरी बांधव अजूनही खैराच्या झाडापासून कात तयार करणे, लाकडे गोळा करून जळणाकरीता विकणे, जंगलातून गोळा केलेल्या वस्तू विकणे, झाडे तोडून कोळसा पाडणे अशा गोष्टी उपजिविकेसाठी करतात. त्यांना मासेमारी शिकार या गोष्टींची आवड असते आणि मासे किंवा पक्षी यांच्या मोबदल्यात ते भात किंवा इतर धान्य घेतात. उन्हाळयाच्या दिवसात त्यांना भातशेतीच्या बांधबंदिस्तीचे काम मिळते. पावसाळयात शेतमजुरीचे काम मिळते. अशा प्रकारची कामे मिळणे हे तसे अनिश्चित स्वरूपाचे असते आणि म्हणूनच जंगलातून जी फळे, कंदमुळे, शेतातले उंदीर किंवा तत्सम गोष्टी मिळतात त्यावर गुजराण करण्याची वेळ त्यांच्यावर येते. भाताची झोडपणी झाल्यावर शेतात पडलेली साळ ते गोळा करतात व घेऊन जातात. तसेच शेतातील उंदराची बिळे खणून त्यात उंदरांनी साठविलेला तांदूळ गोळा करतात. कातकरी समाजाकडे स्वत:ची जमिन जवळ–जवळ नाहीच अणि नियमित अर्थार्जन होईल असा धंदाही नाही.[८]

M.S. ART'S & COMMERCE COLL. RAHU (PUNE)

### ७. कातकरी समाजातील लग्नपध्दती

कातकरी समाजातील प्रत्येक वाडीवर एक प्रमुख कातकरी असतो. त्यास 'नाईक' असे म्हणतात. लहान-लहान भांडन-तंटे सोडविण्या बरोबरच लग्न ठरविण्यासाठी मुलाच्या बापाबरोबर हा नाईक वधुघरी जातो व लग्न ठरविण्यासाठी पुढाकार घेतो. कातकरी समाजात मोरे, वळवी, वाघमारे, पवार, सांडवकर, इत्यादी कुळी आहेत. एकाच कुळीतील तरूण-तरूणींची लग्ने होत नाही. लग्नझाल्यावर वधु पित्यास 'देज' दयावे लागते. यास सोयरीक ढासणे असे म्हणतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधू-वरांना हळद लावतात. बाशिंगे बांधून खलूबाजा वाजवीत वरास वधूच्या घरी घेऊन जातात. लग्न लावण्याचे काम प्रौढ विवाहित पुरूष व जंगम करतात. तांदूळ, हळद, पान-सुपारी व पैसा यांचा 'कणा' मांडतात. वधूला कमरेवर घेऊन वर कण्यास पाच फेऱ्या मारतो व लग्नविधी संपन्न होतो.लग्नानंतर चहापान किंवा मद्यपान केले जाते. पुढे जेवण झाल्यावर रात्रभर वाद्यांच्या तालावर नाचतात आणि गाणि म्हणतात. लग्ने साधारणतः मार्गशीर्ष ते वैशाख महिन्याच्या दरम्यान होतात. प्रसुतीचे काम कातकरी समाजातील सूईनी करतात.

सोन कातकरी समाजात लग्नविधी जातीतील एखादा धर्मशील मनुष्य करतो. त्याला 'गोतर्णी' असे म्हणतात. नवरी मुलगी मंडपाच्या दारातच वराचे स्वागत करून त्याला माळ घालते. नंतर दोघांना समोरासमोर उभे करून मध्ये आंतरपाठ धरतात. गोतर्णी एका घोंगडीवर अक्षता मांडतो व मध्ये पैसा ठेऊन त्यावर हातातील सुपारी टाकतो. त्यानंतर नवरा-नवरी मंडपाभोवती पाच फेऱ्या मारतात व घोंगडीवर ठेवलेल्या अक्षतांना डोकी लावतात. ऐवढे झाल्यावर हा लग्न विधी पुर्ण होतो. कामकरी समाजात अथवर, धेड, सिंधी, सोन, वरप या पाटविभागात लग्नसंबंध होत नाहीत. कातकरी समाजात पुर्वीपासून विधवा विवाह रूढ आहे. या समाजात गंधर्व विवाहाची प्रथाही आहे. या समाजात विधीपुर्वक लग्न केली जातात.[९]

### ८. कातकरी समाजाची अहारपध्दती

नाचणी, वरई, सावा असे कातकरी समाजाचे प्रमुख अन्न आहे. त्याबरोबर ते कंद, उंदिर, खारी, काही प्रकारचे सरडे, मुंगूस आदी प्राण्यांचे मांस खातात. कधी-कधी ते माकडाचे मांसही खातात असे म्हणतात. जवळ पैसे असले की ते भरपूर दारू पितात आणि तंबाखू ओढतात. हरिणे, रानडुक्करे, ससे, ऊद, भेकरी, शेळ्या, बोकड इत्यादी प्राण्यांचे, तसेच कवडे, कबुतरे, रानकोंबडया, होले, मोर, पुसावे,लावरे वगैरे पक्षांचे मांस खातात. या समाजाच्या पोटजातीतील ढोर कातकरी हे गाय, बैल, म्हशी, यांचे मांस खातात.[१०]

### ९. कातकरी समाजाची भाषा

कातकरी समाजाची भाषा मुळात भिल्ली भाषा आहे. कातकरी समाज अनेक शतके महाराष्ट्रामध्ये राहिल्याने ही भाषा मराठी भाषेच्या वळणावर गेली आहे. यांच्या भाषेत अनेक शब्द मराठी शब्दाहून भिन्न आढळतात. उदा.नंडाळ (कपाळ), साकू(अंडे), आंहोडास(नवरा), इत्यादी होय. या समाजाच्या भाषेतील भूतकाळाची रूपे ना हा प्रत्येय लावून होतात. जसे पडना(पडला), बिसना(बसला), वगैरे शब्द होय. डांगमधील भिल्लांची डांगी भाषा व कातकरी भाषा यातही आश्चर्यकारक साम्य आहे. भिल्ल कोकणी वारली व कातकरी यांच्या लोकसाहित्यातील कल्पनासंबंधीत बरेच साम्य आढळते. यावरून कातकरी हे गुजरातवरून सरकत-सरकत येऊन कोकणात स्थायिक झाले असावेत असे दिसते. कातकरी समाजाची मातृभाषा काही ठिकाणी मराठी आहे. परंतू तरीही ते नाकात बोलतात आणि बोलताना प्रत्यय गाळून बोलतात.[११]

### १०. कातकरी समाजाच्या देव देवता व सन उत्सव

कातकरी समाजात वर्दा देव, म्हशा, चेडा, जरीमरी इत्यारी देवतांची पुजा करतात. या समाजात पितरांना खूप मान असतो. सर्वपित्री अमावस्या हा या समाजाचा मोठा सन मानण्यात येतो. तोते थाटाने साजरा करतात. तांदळाची खीर वडे किंवा अन्य गोड पदार्थ करून त्या दिवसी छपरावर ठेवतात. या

K.S.M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)



Scanned by CamScanner

अन्नास कावळा शिवला म्हणजे पितर संतुष्ट झाले असे ते समजतात. शिमग्याचाही सन ते मोठया उत्साहाने साजरा करताता. [१२]

११. कातकरी समाजाची वाद्ये

कातकरी समाजात गौरी, बांगडी, हिजबानी असे नाचाचे प्रकार आहेत. कहाळी, सूर,ढोल, टिमकी, चौडके, डेरा इत्यादी वाद्यप्रकार आहेत. पितळीवर सरबाटीची काठी मेणाने चिटकवून ती घासतात. यास सूर लावणे असे म्हणतात. [१३]

१२. कातकरी समाजाची हत्यारे

कातकरी समाज हा प्रामुख्याने जंगलात रहाणारा असल्याने हा समाज वेगवेगळी हत्यारे वापरतो. कातकरी समाज हा निष्णात शिकारी असून तिरंदाजीतील त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे असते.वन्य पशूंची शिकार करण्यासाठी धनुष्य (धनु) व लोखंडी पातीचे बाण (चिंबुती ) वापरतात. त्याचबरोबर कोयती, कुऱ्हाड, कुदळ, विळा, लहानशी लोखंडी कांब (पहार) इत्यादी हत्यारे वापरली जातात. [१४]

१३. समारोप

कातकरी समाज हा महाराष्ट्रातील एक अदिवासी मागास समाज आहे. आताही हा समाज भटके जीवन जगत आहे. या समाजात आजही शिक्षणाचा अभाव आहे. त्यामुळे हा समाज विविध शासकिय योजनांपासून आजही वंचीत आहे ही आधुनीक महाराष्ट्राची एक शोकांतीकाच म्हणावी लागेल. कातकरी समाजास समाज़ाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाला विविध कृती कार्यक्रमांची आखणी करावी लागेल व फक्त कृती कार्यक्रमांची आखणी करून भागणार नाही तर या कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणीही करावी लागेल.यासाठी प्रभावी यंत्रणा उभारून या समाजास मुळ प्रवाहात आणावे लागेल.

मुरमीचा गण झाला पातालात ते गण गेला कोणाच्या वंश्याला।
खश्याला जर गेला नसता पुंजला मिलाला असता। पन आता कारं न्हाई मिळत पूजला।
येथूनझाला पुरा म्हाईत असल तर सांगा र सभेला।।

या मानसीकतेतून कातकरी समाजाला बाहेर काढावयास हवे. आणि आधुनिकतेशी त्यांची नाळ जोडावयास हवी.

संदर्भग्रंथ

1- Ministry of Tribal Affairs (2011),Annual Report, New Delhi: Government of India
2- Tomar y.p.s,robin d tribhuwan(2004),Development of primitive tribes in Maharashtra, status continuity and change
3- joshuaproject.net
4- mr.vikaspedia.in
5- welling N.A (1934), The Katkaris,Bombay 1934
६. एम केनेडी, (आनुवाद – डॉ हेमन्त आपटे) २०१५, आता विमुक्त, यशोदीप पब्लिकेशन्स,पुणे.

K.S.M'S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

PRINCIPAL
Art's & Commerce College
Rahu, Tal.Daund, Dist.Pune.



Scanned by CamScanner

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 213

## जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील प्रभाव
## वैश्वीकरण का हिंदी भाषा और साहित्यपर प्रभाव
## Impact of Globalization on Language & Literature



अतिथी संपादक :
डॉ. बाबासाहेब देशमुख
प्राचार्य,
ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर
ता. अकोले, जि. अहमदनगर

कार्यकारी संपादक :
डॉ. द. के. गंधारे

संपादन सहाय्य :
डॉ. बी. टी. शेणकर
प्रा. वी. आर. होले
डॉ.आर.डी.ननावरे
प्रा.वी.के.थोरात
प्रा.ए. [illegible] सातपुते
प्रा. [illegible] स. [illegible]

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

K.S.M.'S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

7

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 213

## जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील प्रभाव
## वैश्वीकरण का हिंदी भाषा और साहित्यपर प्रभाव
## Impact of Globalization on Language & Literature

अतिथी संपादक :
डॉ. बाबासाहेब देशमुख
प्राचार्य,
ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर
ता. अकोले, जि. अहमदनगर

कार्यकारी संपादक :
डॉ. द. के. गंधारे

संपादन सहाय्य :
डॉ. बी. टी. शेणकर प्रा. बी. आर. होले
डॉ.आर.डी.ननावरे प्रा.बी.के.थोरात
प्रा.ए.डी.सातपुते प्रा.जी.एस.कुसमुडे

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर

*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.* - मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 213 : Impact of Globalization on Language & Literature
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | डॉ. भास्कर शेळके | 07 |
| 2 | जागतिकीकरण आणि कोकणातील कुणबी आणि कोळी बोली भाषा | डॉ. अनिल उबाळे | 11 |
| 3 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | डॉ. द. के. गंधारे | 16 |
| 4 | 'राब' कथासंग्रहातील 'आवणी'कथेतून दिसणारा जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा.यशवंत मांडकोळी | 20 |
| 5 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | कु. स्वयंपूर्णा गायकवाड | 24 |
| 6 | जागतिकीकरणाचे स्त्रीवादी साहित्यावर झालेले परिणाम | प्रा. राजू शनवार | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचा प्रमाण भाषा व बोली व भाषेवरील प्रभाव | सचिन कोतकर व डॉ. संजय नगरकर | 30 |
| 8 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | डॉ. रंजना कदम | 34 |
| 9 | जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील आदिवासींच्या संस्कृतीवर झालेला परिणाम | प्रा. राधाकिसन मुठे | 40 |
| 10 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | मंगेश जोर्वेकर | 44 |
| 11 | जागतिकीकरण : मराठी भाषा आणि संस्कृती | प्रा. मल्हारी पवार | 48 |
| 12 | मराठी कवितेतून घडणारे जागतिकीकरणाचे दर्शन | प्रा. लक्ष्मण कोठावळे | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. वर्षा कीर्तने | 58 |
| 14 | जागतिकीकरणाचा कीर्तनसंस्थेवर पडलेला प्रभाव | डॉ. दत्तात्रय डुंबरे व डॉ. सर्जेराव जिगे | 63 |
| 15 | जागतिकीकरण आणि अनुवाद कौशल्य | डॉ. रावसाहेब ननावरे | 70 |
| 16 | जागतिकीकरण व प्रादेशिक साहित्य | डॉ. सुवर्णा जाधव | 74 |
| 17 | जागतिकीकरण व नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी | डॉ. योगिता रांधावणे | 77 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी बोलीभाषा | डॉ. कुंडलिक पारधी | 79 |
| 19 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. निवृत्ती मिसाळ | 83 |
| 20 | आदिवासी कवितेत जागतिकीकरणाचे चित्रण | प्रा.चिंतामण धिंदळे व डॉ. तुकाराम रोंगटे | 85 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ. अशोक भवर | 92 |
| 22 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | शुभांगी बारवकर | 97 |
| 23 | जागतिकीकरण आणि मराठी कथा | प्रा. श्रीकांत आल्हाट | 100 |
| 24 | जागतिकीकरण व नव्वदोत्तर ग्रामीण कथा | विकास मांडवडे | 104 |
| 25 | जागतिकीकरणाचा 'वावटळ' ग्रामीण कवितासंग्रहावरील प्रभाव. | डॉ. के. आर. पिसाळ | 108 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. अनिल गर्जे | 112 |
| 27 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | डॉ. कल्पना गावडे | 117 |
| 28 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | श्री. निलेश वाकचौरे व डॉ. रावसाहेब ननावरे | 122 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कथा | डॉ. जी. के. वडितके | 126 |
| 30 | जागतिकीकरण मराठी भाषा व साहित्य | श्रीमती सारिका कर्पे | 129 |
| 31 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. एम. एम. बागुल | 133 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य यांचा बोलीभाषेवरील प्रभाव | अजितकुमार पाटील | 140 |
| 33 | जागतिकीकरण आणि 'लॅन्डमाफिया' आणि 'सत्याग्रह' या कविता | मनीषा सुपेकर व डॉ. रावसाहेब ननावरे | 146 |
| 34 | जागतिकीकरणाचा प्रमाण व बोली भाषेवरील प्रभाव | डॉ. सुनील घनकुटे | 150 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 213 : Impact of Globalization on Language & Literature
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

# जागतिकीकरण आणि मराठी कविता

बारवकर शुभांगी दामोदर
कला व वाणिज्य महाविद्यालय राहू,
ता.दौंड, जि.पुणे. ४१२२०७
चलभाष ९४०३००५०४०

प्रास्ताविक :

मराठी कवितेत नव्वदोत्तर उत्तर आधुनिक कवितेने एक नवा प्रवाह निर्माण झाला आहे. नव्वदनंतरच्या कालखंडात खासगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरणाने साऱ्या जगाचा चेहरामोहराच बदलून टाकला मानवी जीवनाचे वस्तूकरण, बाजारीकरण आणि व्यापारीकरण झाले त्याचे मोठे आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरुपाचे परिणाम समाजजीवनावर झाले. त्याचबरोबर इथल्या माणसांवर, मानवी संस्कृतीवर, मूल्यव्यवस्थेवरही त्याचे खोलवर आणि दूरगामी परिणाम होताना दिसत आहेत. चंगळवादी आणि मध्यम प्रभावित संस्कृतीने माणसाची नैतिक बैठकही काढून घेतली. माणसा माणसामधील संवाद, आत्मीयता, परस्पर आस्था मानवता हिरावली गेली आहे. आणि सर्वत्र आत्मकेंद्री, स्वार्थी, संवेदनशून्य, मानसिकता, बोकाळली आहे. एकीकडे प्रचंड विकास, पैसा आणि दुसरीकडे जीवनातला वाढता बकालपणा आणि एकटेपणा यांनी जीवनाचे स्वास्थ्य हरपले आहे. आणि माणसे आजच्या जागतिकीकरणाच्या काळात मूल्य ऱ्हास करत आहेत जीवनाचा अर्थ न उमगल्याने संभ्रमचित्त, हतबल, आणि निराश झाली आहेत. या सगळया गोष्टीचे प्रतिबिंब नव्वदोत्तरी कवितेत पडलेले आहे. त्यात महानगरी संवेदने इतकेच ग्रामीण संवेदनाही समर्थपणे उतरली आहे.

जागतिकीकरणामुळे गावगाडयातील, समूहभाव, भूतदया, परस्परसहकार्य, विश्वास यासारख्या मानवतावादी मूल्यांवर आधारलेली पारंपारिक जीवनव्यवस्था खिळखिळी होऊ लागली. याचे चित्रण जागतिकीकरणातील ग्रामीण कविता, दलित कविता, स्त्रीवादी कविता आपल्या वेगवेगळया आविष्कार पद्धतीतून आपल्या समोर आलेली दिसते. याबरोबरच जागतिकीकरणातील कविता, विज्ञान, तंत्रज्ञान,यातील वास्तव मांडण्याचा प्रयत्न करताना दिसते.

जागतिकीकरणाने लादलेले नवे जगणे स्वीकारताना सर्वसामान्य माणसाचे समाज, संस्कृती, विचारधारा, भूमिका यांपासून उखडले जाणे हा अनुभव वीरधवल परब, संतोष पवार, श्रीकांत देशमुख व अजित राही यांच्या कवितेत येतो. समकाळाने लादलेल्या नव्या वास्तवाची चिरफाड नव्या प्रतिभा रमेश इंगळे उत्रादकर, रवींद्र इंगळे, दासू वैद्य, यांच्या कवितेतून येते. वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी' या कवितासंग्रहामध्ये वास्तवाचे भान व मूल्यऱ्हासाचे दु:ख सतत व्यक्त होताना दिसते. चित्रलिपी मधील अनेक कवितांमध्ये राजकारणाचे हिंस्त्र आणि गलिच्छ रुप, दरदिवशी हताश होणारा समाज, मूल्याचे झालेला ऱ्हास यांचे चित्रण या कवितासंग्रहात आले आहे.

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण जीवनावर कविता लिहिणाऱ्या कविमध्ये सदानंद देशमुख, केशव देशमुख, प्रदिप पाटील, बालाजी इंगळे, यांचा समावेश करता येईल. यातील अनेकांच्या कवितांमधून समाजवास्तवाचे सुक्ष्म निरीक्षण, स्वत:ची मूल्यव्यवस्था शोधण्याचा प्रयत्न, उपरोधता, साधी सरळ, निवेदनशैली प्रत्ययाला येते. गावगाडयातील बदलत्या कृषी जीवनाची नोंद घेणारी कविता इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर, एकनाथ पाटील, देविदास चौधरी, हे महत्त्वाचे कवी आहेत.

१९७५ नंतरच्या काळात प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, आश्विनी धोंगडे, [illegible] मल्लिका अमरशेख, नीरजा यांनी बदलते सामाजिक वातावरण व स्त्रीयांचा शोध घेण्याचा [illegible] कवितांमधुन केला आहे. हा बदल ही जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील कवितेच्या प्रांतातील [illegible] बदलत्या कालमानानुसार विज्ञान युगातील आईचे मनोभाव साकार करणारी 'पद्मा गोळे' यांची '[illegible] भीती' ही कविता लक्षणीय आहे. त्यात त्या म्हणतात,

' आज आईच्या कुशीत सुद्धा
उरला नाही बाळ, निवारा
द्रोणीच्या अस्त्रासारखा
हिरोशिमाचा बाधेल वारा'. (आकाशवेडी)

आज शिक्षणव्यवस्थेमध्ये सुध्दा खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा [illegible] दिसतोय कवी उत्तम कांबळे यांनी 'जागतिकीकरणात माझी कविता' यामध्ये कवी म्हणतात,

'आता तरी पहिलीपासून इंग्रजी
पहिलीपासून गाईड
पाठीच कुबड निघावं
एवढ सारं दप्तर
उद्या ही पोर मोठ होतील
आणि आपल्या कुबडावर शंभर कोटीचा देश घेऊन फिरतील'.

शिक्षणाची मक्तेदारी आणि खाजगीकरण संशोधनाच्या वेगळया वाटा आणि दिशा दर्शविताना दिसते परंतू कवी पी. विठ्ठल हे वास्तव अचुकपणे हेरतात कवी म्हणतात.

'संत साहित्यावर अनेकांचे डेझर्टेशन
भक्तीला पीएच.डी ची जोड
मिळाली का व्याख्यान छान देता येतात म्हणे
शिवाय सारे संत सिलॅबसला असल्याने
मार्कासाठी का होईना त्यांची फिलॉसॉफी चर्चेत येत आहे.

शिक्षणव्यवस्थेत निर्माण झालेली साखळी पद्धत शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवण्यास अपात्र ठरत आहे. हा बदल किंवा ही मानसिकता बदलाची प्रक्रिया शिक्षण व्यवस्थेवर ताशेरे ओढताना दिसते. अशा [illegible] व्यवस्थेवर भाष्य करताना कवी 'महेश केळूसकर' आपल्या 'पहारा' कवितेमध्ये म्हणतात.

' तर तू माझी कविता लाव पाठ्यपूस्तकात
मग मी तुझी कथा लावतो एखाद्या खंडात
किंवा तू मला तमूक निवड समितीवर घे
मग मीही सूचवतो तुझे नाव दूरदर्शनवर

अरुण काळे यांच्या कवितेचा प्रमुख स्वर जागतिकीकरणाचा तीव्र विरोध करणे शोषितांना जागतिकीकरणातून मुक्त करणं तसेच पुढच्या शतकाचे महानगरीय जीवन समजावून देण्याचा आहे. कवीच्या 'सायरनचे शहर' हा कवितासंग्रहही त्याला अपवाद नाही. विशेष म्हणजे 'सायरनचे शहर' आणि 'नंतर आलेले लोक' या संग्रहातील प्रतिमासृष्टी अगदी योग्य आणि येऊ घातलेल्या काळाचा वेध घेणारी आहे. एवढे असूनही



Scanned with OKEN Scanner

बोली भाषेचा जिवंतपणा कवितेला प्रवाही ठेवून गतिमान करतो हे अरूण काळेंच्या कवितेचे प्रमुख लक्षण म्हणावे लागेल. कारण अरूण काळे यांच्या कवितेतल्या प्रतिमा ह्या वर्तमान काळाचा संदर्भ घेऊन आलेल्या प्रतिमा आहेत. तसेच त्या प्रतिमा जागतिकीकरणाचे वास्तव प्रकट करतात. उदा 'हे प्लास्टीक गर्भाशयासारखं नष्ट न होणार', 'केबलच्या छत्र्या', 'अनुलेखाची बटनं', इत्यादी प्रतिमा व संज्ञा वापरून त्यांनी समकालीन वास्तव चित्रित केले आहे.

कवी अरूण काळे यांची कविता ही खऱ्या कार्यकर्त्याची कविता आहे स्वःत अरूण काळे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्या चारही काव्य संग्रहात सामाजिक आणि राजकीय जीवनावर भाष्य करतात राजकारणातील उलथापालथीचे चित्रण करतात. अरूण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' कवितेत कवी म्हणतात,

'मातेच्या दुधाला मिळतंय मार्केट
माणसाला मिळतेय एक्सचेंज ऑफर
पुरोगामी दुकानात चालतंय कुणाचही क्रेडीट कार्ड
पुन्हा पुन्हा तेच विषय घेऊन
परीक्षा देतात परिवर्तनाच्या चळवळी
कारभारणी सारखं चुपचाप कुणाच्या माग
चालल बौध्दीक नेतृत्व'.

जागतिकीकरणातून बदलेला समाज आणि आजची दाहक स्थिती कवी वरील शब्दांतून उभी करतो. कोणत्याही संवेदनशील मनाला व्याकूळ करणारी सद्यःसमाजस्थिती वरील काव्यपंक्तीतून अधोरेखित होते. हे खुल्या आर्थिक धोरणाचे परिणाम आहेत.

समारोप :

थोडक्यात गेल्या पन्नास साठ वर्षात जीवनचर्चेत जितके बदल झाले आहेत. तितके बदल त्यापुर्वीच्या दोन हजार वर्षात झालेले नाहीत. हे पटवून देण्याचे काम जागतिकीकरणातील कवितेतून आलेल्या चित्रणातून दिसून येते. जागतिकीकरणातील कविता संवेदनांच्या पातळीवरचे सुक्ष्म अनुभव व्यक्त करते. जागतिकीकरणातून वैज्ञानिक शोध आणि त्यांचे तंत्रज्ञानात झालेले रूपांतर मानव समाजाला कोणीकडे खेचत आहे याची सामान्य माणसाला जाणीव निर्माण करण्याची जबाबदारी जागतिकीकरणातील कवींच्या कवितेतून आलेली दिसून येते.

संदर्भ ग्रंथ :

१. रा.ग.जाधव ' आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९९६
२. 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' संपा डॉ. शरद गायकवाड, प्रा. सुनील शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुण प्रथमावृत्ती, २००९.

K.S.M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

PRINCIPAL
Art's & Commerce College
Rahu, Tal.Daund, Dist.Pune.



Scanned with OKEN

Impact Factor - 0.241 | Special Issue - II June 2021 | ISSN 2250 - 0383

Itihas Sankalan Patrika

# SHODHANKAN

International Half Yearly
Peer Reviewed Refereed
Research Journal




Special Issue on

## Ancient Indian Iconography & Architecture

Organized by

Shri Sarda Education Society (Trust)'s

(A Linguistic Minority Educational Institute)

**SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**

ANJANGAON SURJI - 444705,-
DIST - AMRAVATI (Maharashtra)

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

**Executive Editor**

Dr Nitin Ulhasrao Saraf

**Guest Editor**

Dr Arvind Sontakke

**Guest Publisher**

Dr Bashisth Choubey
Principal

K.S.M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

Scanned by CamScanner

## INDEX



| Sr. No. | Article Name | Author | Pg. No. |
|---|---|---|---|
| 1 | सिंधू संस्कृती कालीन मूर्तिकला | डॉ. गिरिधर नागोराव सोमवंशी | 12 |
| 2 | सातगाव भुसारी येथील मूर्ती शिल्प : एक चिकित्सक अभ्यास | डॉ किशोर मारोती वानखडे | 14 |
| 3 | मथुरा आणि गंधार कलाशैलीतील बुद्ध मूर्तीकलेच्या वैशिष्ट्यांचा तौलनिक अभ्यास | प्रा. डॉ. लता सुभाष मोरे (सुरवाडे) | 18 |
| 4 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांवरील शिवालये | डॉ मधुकर व्ही जाधव | 21 |
| 5 | खान्देशातील दुर्लक्षित मुर्ती | श्री महेश सुरेश जोशी | 25 |
| 6 | अंबाजोगाईच्या योगेश्वरी मंदिरावरील वैनायकीची प्रतिमा | प्रा. डॉ. देवर्षी मुकुंद अरविंद | 27 |
| 7 | परभणी जिल्ह्यातील नृसिंह मंदिरे | श्री नागेश सखारामपंत जोशी | 30 |
| 8 | महाराष्ट्रातील किल्ले निदर्शक विरगळ | श्री अनिल किसन दुधाने | 34 |
| 9 | जैन धर्मातील मानस्तंभ एक अभ्यास | सौ छाया नितीन जितूरकर. | 41 |
| 10 | अष्टविनायक - स्थापत्य कला आणि मूर्तीकला यांचा मिलाफ | प्रा. दिपक हिंदूराव तडाखे | 44 |
| 11 | सिंधुकालीन मूर्तीकला | प्रा. डॉ. मंजूषा ह. धापूडकर | 46 |
| 12 | सुधागड तालुक्यातील ठाणाळे (पाली) लेणी | डॉ एस व्ही पाथरकर. | 49 |
| 13 | जीर्ण किंवा खंडित झालेल्या मूर्तींचा वज्रलेप | श्री उमाकांत नागजीभाई राणिंगा | 51 |
| 14 | महाराष्ट्रातील दुर्लक्षित सतीशिळांचा चिकित्सक अभ्यास | प्रा. विकास भानुदास टकले | 54 |
| 15 | जेजुरीगड (गडकोट) खंडोबा मंदिर वास्तु व शिल्पकलेचा अजोड नमुना - एक अभ्यास | डॉ वंदना राजेश शिंदे | 57 |
| 16 | बळसाने, ता.साक्री , जि .धुळे येथील विरगळ एक अभ्यास | श्री ओजस बोरसे | 62 |
| 17 | मंदिर स्थापत्यातील सुरसुंदरींचे महत्व | डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे | 66 |
| 18 | मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य | प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने | 68 |
| 19 | वेताळवाडी किल्ल्यावरील द्वारशिल्पे | प्रा. डॉ. दीपक शिरसाठ<br>प्रा डॉ प्रशांत देशमुख | 71 |
| 20 | वीरगळ इतिहासाचे अबोल साक्षीदार | डॉ उर्मिला क्षीरसागर | 76 |
| 21 | अचलपूर शहरातील भग्न मूर्तीशिल्पे | डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे | 78 |
| 22 | इतिहासाचे मूक साक्षीदार - वीरगळ | डॉ.प्रल्हाद अ. कुलकर्णी | 81 |
| 23 | नांदेड जिल्ह्यातील मातृदेवता मूर्तीचा अभ्यास :एक अवलोकन | डॉ राजाराम रा पिंपळपल्ले | 84 |
| 24 | विदर्भातील भंडारा परिसरातील जैन प्रतिमा | प्रा. डॉ. संजय गोपाळराव ठवळे | 87 |
| 25 | बुद्धकालीन मुर्तीकला | प्रा. डॉ. सारिका विष्णु केदार | 90 |
| 26 | गणेश प्रतिमांचे प्रकार | प्रा. शोभा राजेंद्र भिकाने | 93 |
| 27 | श्री चक्रधरांची प्रणितातीरावरील भ्रमंती मार्गावरील मंदिरे व मुर्तीशिल्प | प्रा. डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे | 96 |
| 28 | पश्चिम विदर्भातील बालाजी मंदिरे | प्रा. डॉ. सिद्धार्थ शिवाजी वाठोरे | 99 |
| 29 | कंधार येथील क्षेत्रपाल: ऐतिहासिक अवलोकन | सिंधू निवृत्ती लोणकर | 102 |
| 30 | विष्णू मूर्ती ओळख | प्रा. स्मिताल रावसाहेब मोरे | 104 |
| 31 | येरगी गावातील मूर्तीशिल्प | श्रीमाला के.जी. | 108 |
| 32 | हूपरीची ग्रामदेवता श्री अंबाबाई | डॉ सुप्रिया चंद्रशेखर खोले | 110 |
| 33 | सिंधू संस्कृतीकालीन मूर्ती शास्त्राचा अभ्यास | कु. सानिया सर्फराजखान पठाण | 113 |



K.S.M.'S ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)



Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील दुर्लक्षित सतीशिळांचा चिकित्सक अभ्यास

प्रा. विकास भानुदास टकले
प्र. प्राचार्य
इतिहास विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, राहू.

## १. प्रस्तावना

आपल्या भारताचा दैदिप्यमान व गौरवशाली इतिहास लाभला आहे. भारतात अनेक पराक्रमी वीर आणि विरांगणा होऊन गेल्या. त्यांच्या पराक्रमाची वीरगाथा त्याकाळी नोंद ठेवायची सोय नसल्यामुळे कुठेतरी दगडावर त्यांची नोंद ठेवलेली दिसते. महाराष्ट्राचा मूलाधार सह्याद्री, गड-किल्ले, पुरातन मंदिरे, लेण्या आणि बारवा अशा अनेक अपरिचित ठिकाणी आपल्याला या नोंदी पहावयास मिळतात. या सगळ्या ठिकाणी काही उभट दगडावर कोरलेली शिल्पे पहावयास मिळतात. त्यांना आपण 'वीरगळ' म्हणतो प्राचीन काळापासून मोठ्या प्रमाणावर वीरगळांची निर्मिती झाली होती. कारण त्यासाठी लागणारे साहित्य व साधने या ठिकाणी विपुल प्रमाणात उपलब्ध होते. मूळातच सह्याद्री पर्वताची निर्मिती ही 'बेसॉल्ट' खडकामध्ये झालेली दिसते. त्यामुळे दगडाची जास्त प्रमाणात उपलब्ध होते. कारण वीरगळ हे साधन पूर्णपणे दगडावर कोरले गेले आहे. जेव्हा कागद उपलब्ध नव्हता तेव्हा दगडांवरील कोरीव कामांना जास्त महत्त्व होते. बहुतेक वीरगळासाठी बेसाल्ट दगड वापरलेला दिसतो. बेसाल्ट हा दगड कणखर असून त्याच्यावर वातावरणाचा जास्त परिणाम होत नाही. पश्चिम महाराष्ट्रात मात्र कोकण किनारपट्टीमध्ये कणकवली पासून सातपुडा पर्वतापर्यंत जांभा दगड आढळतो. तो बेसाल्टच्या मानाने जास्त ठिसूळ आहे. त्यामुळे या भागातील विरगळ, किल्ले वेगळे दिसतात व मंदिरे ही वेगळी दिसतात.[१]

महाराष्ट्र जसी साधू संतांची पावन भूमी आहे तशीच ती शेकडो पराक्रमी वीरांची लढाऊ वीर भूमीही आहे. इथे घरोघरी वीर पुरुष जन्माला आले. ज्यांनी स्वतःच्या मनगटाच्या ताकदीवर इथल्या भूमीचं आदिम काळापासूनच्या सर्व आक्रमणापासून प्राणपणाने संरक्षण केलं, प्रसंगी कसल्याही परताव्याची अपेक्षा न करता प्राणही दिले. त्यांच्या त्यागाला, त्यांच्या पराक्रमाला इथली माणसं इथली माती विसरली नाही. त्यांच्या वीरमरण पश्चात त्यांच्या स्मृती जगवण्यासाठी गावागावांच्या मध्यवर्ती ठिकाणी, मंदिरांच्या प्रांगणात, वेशीवर काळे कातळ शिल्पबद्ध करून ठेवण्यात आले. वीरांच्या स्मृती जागवणाऱ्या या कातळ शिल्पांना आपण 'वीरगळ' म्हणून ओळखतो. या वीरांसोबत ज्या-ज्या वेळी त्यांची पत्नी सती जात असे त्या-त्या वेळी त्या स्त्रीच्या आठवणीत सतीशिळा कोरली जाई. महाराष्ट्र एक गाव नसेल जिथं वीरगळ किंवा सतीशिळा सापडणार नाही. पण या वीरगळींबद्दल व सतीशिळेबद्दल कमालीची अनास्था आणि अज्ञान जनमानसात दिसून येते.

## २. सतीशिळा

वीरांबरोबर सती जाणाऱ्या स्त्रियांच्या स्मरणार्थ 'सतीशिळा' बनवल्या जात. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या सतीशिळांमध्ये स्त्रीचा खांद्यापासून हात चित्रीत केलेला असतो. हा हात कोपरात काटकोनात वळलेला असतो. हातात बांगड्या असतात. हाताखाली दोन प्रतिमा कोरलेल्या असतात. त्या स्त्रीच्या मुलांच्या प्रतिमा असाव्यात. या हाताची रचना आशिर्वाद देणाऱ्या हाताप्रमाणे असते. तसेच सतीशिळा देवळाच्या परिसरात उभारल्या जात असत. त्यामुळे सतीशिळेची शेंदुर लाऊन पूजा केल्याचे बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळते. वीरगळी प्रमाणे एक, दोन किंवा तीन शिल्प चौकटीत सतीशिळा कोरलेली असते. त्यात खालच्या चौकटीत चितेवर बसलेली स्त्री, चितेच्या बाजूला उभी असलेली स्त्री किंवा नवऱ्याच डोक मांडीवर ठेऊन चितेवर बसलेली स्त्री, वाघावर, घोड्यावर बसलेली स्त्री कोरलेली असते. दुसऱ्या चौकटीत नवरा बायको हातात हात घालून उभे राहीलेले दाखवलेले असतात. पहिल्या किंवा दुसऱ्या चौकटीत उजव्या बाजूला सतीचा कोपरापासूनचा हात दाखवलेला असतो. तिसऱ्या चौकटीत नवरा बायको पिंडीची पूजा करतांना दाखवलेले असतात. त्यावर सूर्य चंद्र कोरलेले असतात. वीराबरोबर त्याच्या दोन किंवा तीन पत्नी सती जात असत. त्यांचे प्रतिक म्हणून कोपरात वाकवलेले दोन किंवा तीन हात दाखवलेले असतात. काही वीरगळामध्ये वीराची पत्नी आणि सतीचा हातही दाखवलेला असतो. त्याला वीरसतीगळ असे म्हणतात. ही वीराची आणि सती या दोघांची एकच स्मृतीशिळा असते.

## ३. महाराष्ट्रातील सतीशिळा

### ३.१.गावडी दारफळची सतीशिळा

उत्तर सोलापूर तालुक्यातील गावडी दारफळ हे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या सीमेवरील दुर्लक्षित असणारे तीन हजार लोकवस्तीचे गाव आहे. या ठिकाणी खंडोबा मंदिरापुढे शके १३१२ सालची एक सतीशिळा सापडली आहे. या शिळेवर एक शिलालेख कोरलेला आहे. अशा प्रकारचा शिलालेख दुर्मिळ मानला जातो. त्या शिळेवर कोपरात दुमडलेला बांगड्या घातलेला हात असून त्यावर शके १३१२ प्रमोद संवत्सर लिहिलेले आहे इतर अक्षरे आजून वाचता आलेली नाहीत.[२]

### ३.२. किनीकदू येथील प्राचीन सहगमन सतीशिळा

K.S.M. ARTS & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)



Scanned by CamScanner

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील किनीकदू हे दोनशे लोकवस्तीचे गाव आहे. या गावात एक प्राचीन सतीशिळा आहे. किनीकदू येथे किमान पाचशे वर्षांपूर्वीची ही सतीशिळा असून ती सहगमन सतीशिळा आहे. ही सतीशिळा तीन टप्प्यात कोरलेली आहे. खालच्या टप्प्यात दोघे पती-पत्नी सहगमन करत असल्याचे शिल्प कोरलेले आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वीरस्त्रीचे घोड्यावर आरूढ शिल्पांकन आहे. दोन्ही हातात गोल कडे आहेत. या सतीशिळेवर सतीचा हात कोरलेला आहे. तो वर स्वर्गाच्या दिशेने दाखविला असून, तिच्या हातात पाच बांगड्यांचा चुडा भरलेला आहे. त्यानंतर वीरमरण पावलेल्या पतीचे आणि पत्नीचे स्वर्गात स्वागत करणाऱ्या दोन अप्सरा नमस्कार मुद्रेत दाखविलेल्या आहेत व त्या खाली नंदीची प्रतिमा कोरलेली आहे. सर्वात वरच्या शेवटच्या टप्प्यात कलश स्वर्गस्थळ दाखविले असून त्या बाजूस सूर्य व अर्धचंद्र कोरलेले आहेत.[3]

### ३.३. नारायणपूरची सतीशिळा

पुणे जिल्ह्यातील पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या नारायणपूर येथील यादवकालीन नारायणेश्वराच्या मंदिरासमोर एका शेतात दोन सतीशिळा आहे. यातील एक सतीशिळा खूपच वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण या सतीशिळेवर सतीचे तब्बल चार हात एकाच शिळेवर कोरलेले आहेत. शिवाय या शिळेवर लढाईचे दृश्यही कोरलेले आहे. कदाचित एकाच वेळी सती गेलेल्या अनेक स्त्रियांचे स्मारक म्हणून ही शिळा कोरलेली असावी.

### ३.४. नारायणगाव येथील सतीशिळा

नारायणगाव येथील श्री संत सेना महाराज समाज मंदिराजवळून मीना नदीवरील नेवकर पुलाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पूर्वेकडील दुर्लक्षित अशा ठिकाणी एक सतीशिळा आहे. एका उंच दगडी चबुतऱ्यावर एक ते दीड हात उंचीच्या सपाट दगडावर हाताच्या कोपऱ्यात काटकोनात दुमडलेला स्त्रीच्या हाताचा पंजा दाखविला असून, मनगटात चुडा भरलेला, दंडावर चोळीचा भाग, तळहातावर गोल प्रतिक असलेले चिन्ह स्पष्ट दिसत आहे. सतीशिळेवर सूर्य कोरलेला असून याचा अर्थ जोपर्यंत सूर्य उगवत आहे तोपर्यंत या सतीची कीर्ती कायम राहील असे या सतीशिळेतून स्पष्ट होते.

### ३.५. सिंदखेड वरखेड येथील सतीशिळा

अकोला जिल्ह्यातील सिंदखेड वरखेड येथे सतीचा स्तंभ आहे. तो गावातील कोणा श्रीमंत घरातील सौभाग्यवती स्त्री सती गेल्यानंतर करून घेतलेला गेला असावा असा अंदाज आहे. त्या शिळेत एक हात वंदन स्वरूपाचा असून तो सूर्याला नमन करत आहे. त्या हातात चुडा आहे, बाजूला चंद्रकोर ही आहे.

### ३.६. मुरबाड येथील सतीशिळा

मुरबाड येथिल गोरखगड किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या डेरमाता मंदिरासमोर दोन सतीशिळा आहेत. पहिली सतीशिळा मंदिरात प्रवेश करताना डाव्या बाजूला असलेली दिसून येते. या सतीशिळेवर सर्वात खालच्या कप्प्यात चिता पेटलेली दाखवली आहे. चितेवर विराचा शव असून त्याच्या शेजारी वीराच्या पाच पत्नी दाखविलेल्या आहेत. दुसऱ्या भागात पाचही सतींची घोड्यावरून मिरवणूक काढलेले आहे. वीराच्या पाच पत्नी प्रत्येकी एका घोड्यावर आरूढ आहेत असं दर्शविलेले आहे. तिसऱ्या भागात पाच सतींचे हात कोपऱ्यातून दुमडलेले दाखविलेले आहेत. चौथ्या भागात वीर आपल्या पाच पत्नींसह शिवलिंगाची पूजा करत आहे. त्यांच्या सोबत स्वर्गाचा प्रतिनिधी पुरोहित देखील या सतीशिमध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

दुसऱ्या सतीशिळेत सर्वात खालच्या भागात मृत वीर आणि त्याची पत्नी दाखविलेली आहे. दुसऱ्या भागात घोड्यावर आरूढ झालेली स्त्री दर्शविलेली आहे व तिच्या हातात सतीचे वाण दिसत आहे. त्या वरच्या भागात सतीचा हात स्वर्गाच्या दिशेने दाखविलेला आहे. कोपरापासून दुमडलेल्या हातात बांगड्या आहेत. सगळ्यात वरच्या भागात वीर सपत्नीक नमस्कार मुद्रेत बसलेला आहे. बाजूला शिवपिंडी, त्याखाली नंदी व पुरोहित पूजा करताना दाखविलेले आहेत.

### ३.७. देवठाणा खांब येथील सतीशिळा

वाशीम जिल्ह्यात देवठाणा खांब या नावाचे गाव आहे. तेथे डाकूंसोबत लढणाऱ्या वंजारी समाजाच्या विधवेच्या नावे चित्रांकित शिलालेख आहे.

याशिवाय माणगाव तालुक्यातील साईकोंड, वसंतगड, जेजुरी, वसई, मुरबाड तालुक्यातील सिद्धगड, आहमदनगर जिल्ह्यातील राशीन व पांडे पेडगाव, बागलाण तालुक्यातील दुधीगडाच्या पायथ्याजवळ असणाऱ्या भामेश्वर मंदिराजवळही काही दुर्लक्षीत सतीशिळा आढळतात.

### ४. समारोप

सतीशिळा आपल्याला जुन्या प्रथांची आठवण करून देतात. त्या वीराची पत्नी आपल्या पतीबरोबर सती जात असल्याचे या सतीशिळा सांगतात. त्यामुळे त्यावेळच्या समाज मनावरही प्रकाश पडतो. या सतीशिळेच्या माध्यमातून त्यावरील नक्षी, स्त्रियांचे पेहराव, दागदागिने यांची कल्पना आपल्याला येते. असे असले तरीही या प्रथेचे समर्थन करता येणार नाही. संत कबीर हे पहिले कवी आहेत की



Scanned by CamScanner

ज्यांनी सती जाताना स्त्रीच्या वेदना त्यांच्या काव्यातून मांडल्या आहेत. सतराव्या शतकात काश्मीरचा शासनकर्ता राजा सिकंदर यांनी सर्वप्रथम सतीची प्रथा बंद केली होती. डिसेंबर १६६३ मध्ये मोगल बादशहा औरंगजेबाने आदेश दिला आणि त्याने आपल्या राज्यात कोठेही सतीचा प्रकार केला तर त्यासाठी कडक कारवाई करण्यात येईल आणि दंड ठोठावण्यात येईल असे जाहीर केलं. औरंगजेब राज्यावर असेपर्यंत स्त्रिया सती जाण्याचे प्रमाण जवळपास आढळत नाही. अपवाद म्हणून फक्त राजघराण्यातल्या स्त्रिया काही ठिकाणी सती गेल्या आहेत. त्यानंतर पोर्तुगाली गव्हर्नर अल्बुकर्क यांनीही या प्रथेविरुद्ध जोरदार आवाज उठवला होता. भारतात मोगल सम्राट अकबर आणि पेशव्यांबरोबरच गव्हर्नर लॉर्ड कॉर्नवालीस, लॉर्ड हेस्टिंग्स यांनी प्रयत्न केले होते. पण त्यांना तितकेसे यश आले नाही. शिखांचे पहिले गुरू गुरू नानक यांनी हि जाहीररीत्या सती प्रथेची निंदा केलेली दिसून येते. ब्रिटिश काळापर्यंत ही सती प्रथा भारतीय समाजात अस्तित्वात होती. ब्रिटिशांनी कायदा करून या अनिष्ट प्रथेला १८२९ मध्ये पायबंद घातला.

**संदर्भसूची**

१. दुधाणे आणिल, (२०२०), "इतिहासाचे मूक साक्षीदार वीरगळ आणि सतीशिळा", मराठी देशा फाउंडेशन प्रकाशन, कोल्हापूर, पान नं - ०५.
२. दैनिक सकाळ, २१ मे २०२१, सोलापूर
३. दैनिक सामना ०९ ऑक्टोबर २०२० लातूर
४. स्थळभेट, मौजे - नारायणपूर, तालुका - पुरंदर, जिल्हा - पुणे, दि. २२/०९/२०१८
५. गोडबोलेअच्युत व देशमुखदीपा, "बाईच्या जिवंतपणाला चूड लावणाऱ्या प्रथेची गोष्ट : सती प्रथा आणि राजा राममोहनरॉय," 'मनोविकास इत्यादी', दिपावली विशेषांक - २०१७, पान: नं – ७०, पुणे.
६. Altekar A. S,(1938),"The Position of Women in Hindu Civilization (from prehistoric times to the present day)," the cultural publication house, Banaras hindu university press, Banaras.
७. Sarojini Devi, (1961) "Sati in Vijayanagara," Proceedings of the Indian History Congress, Vol. 24.

ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

PRINCIPAL
Art's & Commerce College
Rahu, Tal.Daund, Dist.Pune



Scanned by CamScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor 6.625 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue – 300, July-2022

## Multidisciplinary Issue





K.S.M.S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

July-2022 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-300

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :**

1. **Shinzo Abe**, a former prime minister of Japan and a serving member of the House of Representatives, was assassinated on **8 July 2022** while speaking at a political event outside Yamato-Saidaiji Station in Nara City, Nara Prefecture, Japan (Source Internet)

2. The National Democratic Alliance (NDA) backed **Draupadi Murmu**, 64, and is the second woman and first Adivasi female to hold the position of the **President of India since 25th July 2022**. She defeated the opposition's pick Yashwant Sinha by a massive margin after receiving more than 64% valid votes. (Source Internet)

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

## INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 01 | Potential Risks to Human and Animals Health Due to Bio-Accumulation of Heavy Metal Cadmium Chloride in Snail, Viviparus Bengalensis | R. T. Chaudhari | 05 |
| 02 | Gender Differences in Big-5 Personality Traits among Medical College Students | Charuta Vagare | 09 |
| 03 | Intensity of Madness and Insanity in Film Adaptation of the Wide Sargasso Sea | Dr. Swapna Vyawahare | 15 |
| 04 | A Study on Consumer Perceptions of Online Grocery Shopping in Navi Mumbai Area, Maharashtra | Dr. Harshada Aurangabadkar, Dr. Tushar Savale, Dr. Rakesh Patil | 18 |
| 05 | Smart Working Arrangements : A Win Win Business Strategy in the Covidised World | Dr. Vaishali Trivedi | 25 |
| 06 | English Language Education through Literature | Dr. Sachin Uppar | 31 |
| 07 | Geographical Analysis of Health Employee in PHCS & SCS in Malegaon and Nandgaon Tahsils of Nashik District | Dr. Sunil Deore | 35 |
| 08 | Problems of Senior Citizens in A Changing Society: An Indian Perspective | Dr. Vinod Gajghate | 43 |
| 09 | Study of Resource Sharing and Networking in the Libraries of National Power Training Institute | Suvarna Inamdar | 50 |
| 10 | Women in Co-operatives | Dr. Manjusha Kharole | 54 |
| 11 | Influence of Social Network Sharing Culture on Knowledge Sharing Behaviour in Higher Education | Dr. Tushar Savale, Prof. Prabodhan Patil, Prof. Priyanka Savale | 56 |
| 12 | The Impact of Gender, Raring Environment and Resilience on Mental Health of College Going Students : An Analytical Study | Charuta Vagare | 61 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 13 | तुलसीदास के काव्य की प्रासंगिकता | डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी | 72 |
| 14 | मैथिलीशरण गुप्त के 'सखी,वे मुझसे कहकर जाते' कविता में व्यक्त यशोधरा के मन की पीड़ा | डॉ. सुनील जाधव | 75 |
| 15 | राजस्थान का एकीकरण और सरदार पटेल | डॉ. अर्चना द्विवेदी | 78 |
| 16 | भारतीय राजनीती और जाति: एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. शिखा जैन | 86 |
| 17 | लक्ष्मीनारायण लाल के 'कालपुरुष एवं अजन्ता की नर्तकी' एकांकी में दुःखमय वैवाहिक जीवन के कारण एवं स्त्री की पीड़ा | डॉ. सुनील जाधव | 93 |
| | **मराठी विभाग** | | |
| 18 | धर्मांतरित ख्रिस्ती लोकगीतांवरील भारतीय संस्कृतीचा प्रभाव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 96 |
| 19 | समर्थांची दीर्घ रचना व प्रासंगिक प्रकरणातील साम्य | प्रा.नम्रता बागडे | 107 |
| 20 | समाज चिंतनातून व्यक्त झालेले दि. के. बेडेकरांचे चिंतन | डॉ.पुरुषोत्तम जुन्ने | 112 |
| 21 | बाबू बिरादार ह्यांच्या कादंबऱ्यांतील भाषासौंदर्य | प्रा. रोहिणी मदने, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 116 |
| 22 | शांता शेळके यांच्या ललितगद्य लेखनाचा अभ्यास | डॉ. रंजना कदम | 128 |
| 23 | वसंत आबाजी डहाके ह्यांच्या 'अधोलोक' या कादंबरीतील आशय | सदाशिव शिंदे | 139 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | लक्ष्मीकांत देशमुख यांची कादंबरी समीक्षा | श्री. अमर तांबे | 144 |
| 25 | हमीद दलवाई यांच्या 'इंधन'ची प्रासंगिकता | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 154 |
| 26 | प्राचीन भारतातील कायदा व न्यायव्यवस्था | प्रा. श्री. आर. के. सूर्यवंशी | 158 |
| 27 | महाराष्ट्रातील रामोशी समाजाच्या मध्ययुगीन नेतृत्वाचा इतिहास : एक अभ्यास | डॉ. विकास टकले | 162 |
| 28 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये | प्रा. डी. झेड. सावळे | 166 |
| 29 | महात्मा फुले यांच्या अप्रकाशित आठवणी : एक आढावा | प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे | 172 |
| 30 | राष्ट्रनिर्माते महात्मा ज्योतीराव फुले | डॉ. देविदास नरवाडे | 177 |
| 31 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण | डॉ. दिपक गायकवाड | 181 |
| 32 | भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ : एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | प्रा. श्री. आर. के. सूर्यवंशी | 185 |
| 33 | पंडिता रमाबाई यांच्या विचारांचे आधुनिक काळातील महत्त्व | प्रा. डी. झेड. सावळे | 189 |
| 34 | भारतातील एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडातील भटक्या व विमुक्त - जातीं-जमातींविषयींच्या सरकारी कायद्यांचा अभ्यास | डॉ. विकास टकले | 193 |
| 35 | कृषिसंस्कृतील सण-उत्सव | अश्विनी कणसे | 198 |
| 36 | शारीरिक तंदुरुस्ती व कौशल्याधारित क्रॉस ट्रेनिंग योजना - एक अभ्यास | डॉ.संदीप लोंढे | 203 |
| 37 | कोव्हिड-१९ चा घरकाम करणाऱ्या महिलांवरील परिणाम : एक अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 207 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

K.S.M.'S. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

# भारतातील एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडातील भटक्या व विमुक्त जातीं-जमातींविषयींच्या सरकारी कायद्यांचा अभ्यास

प्रा. डॉ. विकास भानुदास टकले,
इतिहास विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, राहु.
Email.ID- vikastakale2020@gmail.com
Mobi – 9975184544

## १. प्रस्तावना

भारतात काही जमातींची गुन्हेगार जमाती म्हणून शासकीय स्तरावर नोंदी ठेवण्याची व त्या अनुषंगाने त्यांना वागणूक देण्याची प्रथा ब्रिटिश अमदानीच्या सुरुवातीच्या कालखंडात इ.स १७९३ साली निर्माण केलेल्या 'रेग्युलेशन २६' या अधिनियमाने सुरू झाली. पुढे याच अधिनियमाचे रूपांतर ठगी व डकॉइटी खात्याच्या निर्मितीत झाले. "सन.१८६० साली भारतीय दंड संहिता अमलात आली. पुढे सन१८७१ मध्ये 'गुन्हेगार जमाती कायदा' (क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट) करण्यात आला. या कायद्याचे सन१८२४ सालच्या 'गुन्हेगार जमाती केंद्रीय अधिनियम' (क्रिमिनल ट्राइब्ज सेंट्रल ॲक्ट) या कायद्यात रूपांतर झाले. हा कायदा सन.१९५२ पर्यंत अंमलात होता."१ एखाद्या जमातीची वंशपरंपरेने गुन्हेगार म्हणून नोंद ठेवणे हा प्रघात शासकीय तसेच सर्वसामान्यांच्या दृष्टीने पडला.

आदिवासी जमातींपैकी काही टोळ्या एका ठिकाणी स्थिर होऊन कायम राहत नसत. आपल्या उपजीविकेसाठी रानावनात भटकत असत. रानातील जनावरांची शिकार करून अथवा जंगलांमधून खाद्य शोधून त्यावर त्यांचा उदरनिर्वाह होत असे. "गावगाड्याच्या चाकोरीत बसेल आणि गावकऱ्यांच्या गरजा भागवून प्रामाणिक जीवन जगता येईल असा कोणताच व्यवसाय त्यांना लाभला नाही. अगर ते पत्करू शकले नाहीत. त्यांच्या वंशजांना ही हेच जीवन जगावे लागले आणि कालक्रमाने त्यांच्या गुन्हेगारी जमाती बनल्या असेही काहींचे मत आहे."२ इंग्रज राजवटीमध्ये अंमलात आलेल्या जंगल कायद्यामुळे आदिवासींच्या मुक्तसंचारावर बंधने आली.

ब्रिटिश कालखंडामध्ये वेगवेगळे कायदे भारतात तयार करण्यात आले. या कायद्यानुसार गुन्हेगार ठरविलेल्या अनेक जातींवर बंधने घालण्यात आली. "भटक्या-विमुक्त जातींना गुन्हेगार ठरविणारा कायदा १८७१ मध्ये अस्तित्वात आला. त्यात वेळोवेळी सुधारणा होऊन १८९७, १९०८, १९११, १९१९, १९२२, १९२४, १९३६, १९३७ आणि १९३८ असे वेगवेगळे कायदे पारित करण्यात आले. या कायद्याला भटक्या व विमुक्त जातींनी वेळोवेळी विरोधही केलेला होता."३ कारण हे कायदे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे आचरण करणाऱ्या राज्यघटनेमधील तरतुदींच्या विरोधी आहे.

S. M. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

## २. भटक्या व विमुक्त जातीं-जमातींविषयींचे सरकारी कायदे

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतातील भटक्या लोकांची समान फिरस्ती जीवनशैली असणाऱ्या इतर ठिकाणच्या समूहाशी तुलना करून त्या दोघांमधील समान गुन्हेगारीची तत्त्वे पुढे आणण्यात आली. "सन१८७१ मध्ये भारतामध्ये ब्रिटिशांनी पाहणी करून इंग्लंडच्या पार्श्वभूमीवर भारतीय भटक्यांना गुन्हेगार ठरविले गेले. वास्तविक इंग्लंडमधील फिरस्ते आणि भारतीय भटके यांच्या जगण्यात भेद होते. तरी

इंग्लंडच्या फिरस्ती समुहाची वैशिष्ठ्ये भारतीय भटक्यांना चिकटवली गेली."४ सन.१८७१ मध्ये इंग्रज सरकारच्या राजवटीत भटक्या जाती जमाती संदर्भात पहिला गुन्हेगारी कायदा करण्यात आला. या सन.१८७१ च्या व्यापक पाहणीच्या वेळी पहाणी करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना मदत करणाऱ्या हिंदी व्यक्ती व संस्थांनी काही चुकीची माहिती पुरविली. यामुळे भारतातील हा भटका समाज आजही त्याची फळे भोगीत आहे.

## २.१ सन १८७१ चा कायदा

सन. १८५७ च्या उठावा नंतर इंग्लंडच्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार भारताचा संपूर्ण कारभार इंग्लडच्या राणीच्या हाती गेला. दरम्यानच्या काळात समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले होते. यासंदर्भात लोकांच्या तक्रारी वाढल्या होत्या. दरोडेखोरी, वाटमारी, खूण अशा प्रकारच्या घटना नित्याच्याच झालेल्या होत्या. यामुळे समाजात अशांतता पसरलेली होती. प्रशासनाच्या दृष्टीने अशी अशांतता धोक्याची होती. त्यामुळे "गुन्हेगारी, वाटमारी अशा प्रकारच्या घटना थांबविण्यासाठी एखाद्या सक्षम कायद्याची आवश्यकता निर्माण झालेली होती. याचा सारासार विचार करून मध्यवर्ती सरकारच्या कायदा व सुव्यवस्था समितीचे एक सदस्य टी. व्ही स्टीफन यांनी सरकारकडे एक बिल मांडले."५ ते बिल पारित होऊन याचे रूपांतर १८७१ मध्ये कायद्यात करण्यात आले. या कायद्यालाच सन.१८७१ चा गुन्हेगारी कायदा असे म्हणतात. सुरुवातीला हा कायदा सिंधू प्रांतातील जमातीला लागू करण्यात आला. येथूनच भटक्यांच्या विकासातील राजकारणाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

## २.२ सन. १८९७ चा कायदा -

सन.१८९७ च्या गुन्हेगारी कायद्यातील तरतुदी आणि शिक्षेचे प्रकार अतिशय भयंकर होते. "या कायद्यानुसार गुन्हेगार ठरविलेल्या समाजातील लोकांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलला होता. काही तज्ज्ञ अभ्यासकांनी भटक्या लोकांच्या गुन्हे करण्याच्या प्रवृत्ती मागे आर्थिक कारणे असल्याचे सांगण्यास सुरुवात केली."६ परिणामी या गुन्हेगारी जाती-जमातींकडे सुधारणात्मक दृष्टीने पाहिले जाऊ लागले. म्हणून सन.१८९७ मध्ये, सन.१८७१ च्या गुन्हेगारी जमाती कायद्यांमध्ये काही सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. १८९७ च्या कायद्याचा प्रवास सुधारणावादी मानसशास्त्र, गुन्हेशास्त्र व समाजशास्त्र अशा प्रकारे झालेला दिसून येतो. सन.१९०८ पर्यंत पकडणे व तुरंगात टाकणे यामुळे कर्त्या पुरुषाच्या अभावी त्यांची कुटुंबीयांची गुन्ह्यांमध्ये वाढ होत असे. तसेच त्यांना तुरुंगात टाकले आहे अशा व्यक्ती तुरुंगातून बाहेर येताना जास्त कट्टर व सराईत गुन्हेगार बनून येतात. म्हणून सन.१९०८ मध्ये या भटक्या जाती-जमातींना वसाहतीत रोजगाराची सोय करणे क्रमप्राप्त झाले.

## २.३ सन.१९०८ च्या गुन्हेगार जमातींचा वसाहतींचा कायदा

K.S.M. ART'S & COMMERCE COLLEGE RAHU (PUNE)

सन.१९०८ मध्ये व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो ॥ याच्या काळात गुन्हेगारी जमातींच्या वसाहतीचा कायदा पारित करण्यात आला. याच काळात इंग्लंडमध्ये साल्व्हेशन आर्मी व इतर काही धार्मिक संघटनांनी गुन्हेगार जमातीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयोग सुरू केले. या साल्व्हेशन आर्मीलाच 'मुक्तीसेना' असे म्हणतात. या मुक्तीसेनेची स्थापना विल्यम बुथ यांनी सन.१८६१ मध्ये लंडन येथे केली होती. ही धार्मिक संस्था होती. "विल्यम बुथ यांचा जावई फ्रेड्रिक बुथ टकर यांनी सन.१८८१ साली हिंदुस्थानात मुक्तीसेनेने काम करायला सुरुवात केली. ICS पदाचा राजीनामा देऊन ते मुक्तीसेनेत सामील झाले होते. त्यांनी फकीरसिंग असे

नाव धारण केले होते."७ भारतातील गुन्हेगार जमातींमध्ये सुधारणा घडवून आणण्यामध्ये या मुक्तीसेनेचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे दिसते. याचाच परिणाम म्हणून सन.१९०८ साली पहिला गुन्हेगार जमातींसंदर्भात वसाहतींचा कायदा पास करण्यात आला. या कायद्यामुळे गुन्हेगार जाती-जमाती संबोधल्या गेलेल्या भटक्या समाजाची मोठ्या प्रमाणात अवहेलना झाली. "वसाहतींभोवती तीन-तीन तारांची कुंपणे उभारण्यात आली. कडक पहारे बसविण्यात आले. कालांतराने त्या वसाहतींमध्ये शाळा, आरोग्य केंद्र व उद्योग केंद्रेही सुरू करण्यात आली."८ असे असले तरी गुन्हेगारीचा शिक्का भटक्या जाती जमातींच्या माथ्यावरुन पुसला गेलाच नाही.

## २.४ सन. १९११ चा गुन्हेगार जमाती कायदा

सन. १८७१ च्या गुन्हेगारी कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सन. १९११ चा गुन्हेगारी जमाती विषयक कायदा पास करण्यात आला. म्हणजेच "सन. १९११ च्या कायद्यानुसार दुसऱ्यांदा १८७१ च्या गुन्हेगारी कायद्यात सुधारणा करण्यात आली."९ सन. १९११ साली गुन्हेगार जमातींच्या पुनर्वसनाचा व त्यांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी ऑल इंडिया जेल कमिशनची नेमणूक करण्यात आली. या कमिशनने काही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. त्यापैकी "गुन्हेगार जमातींच्या शिक्षणावर भर देण्याची केलेली सूचना अत्यंत महत्त्वाची होती."१० ऑल इंडिया जेल कमिशनच्या सूचनांमुळे वसाहतींच्या सुधारणांमध्ये हातभार लागलेला दिसून येतो. "या वसाहती म्हणजे दमन यंत्रणा नसून या जमातींची पुनर्वसन करणे हे वसाहतींचे महत्त्वाचे उद्दिष्ट असायला हवे."११ असे ऑल इंडिया जेल कमिशनच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले होते.

## २.५ सन. १९२४ चा सेटलमेंट ॲक्ट

सन.१९२४ च्या सेटलमेंट ॲक्टनुसार भटक्या समाजातील १४ जाती-जमातींना ५२ ठिकाणी वसाहती स्थापन करून तिथे बंदिस्त करण्यात आले. त्या जमाती पुढील प्रमाणे आहेत. "१.बेरड, २.बेस्तर, ३.भामटा, ४.कैकाडी, ५.कंजारभाट, ६.बंजारा, ७.पारधी, ८.राजपूत, ९. कटाबू, १०.राजपारधी, ११.रामोशी, १२.वडार, १३.वाघरी, १४.छप्परबंद इत्यादी जमातींना कायद्याच्या कचाट्यात बंदिस्त करण्यात आले. या लोकांच्या कपाळी कायद्यानेच गुन्हेगारीचा शिक्का मारला होता."१२ त्यामुळे भटक्या जाती जमातींच्या लोकांना समाजातील इतर लोकांप्रमाणे उजळमाथ्याने व सुरक्षितपणे जीवन जगता येत नव्हते. या कायद्यामुळे पोलिसांचा पहारा, रात्री-अपरात्री पोलीस स्टेशनला हजेरी द्यावी लागत असे. शिवाय एखाद्या ठिकाणी चोरी किंवा दरोडा पडल्यास पोलिसांची पहिली धाड या भटक्या लोकांच्या वस्तीवर पडत असे.

## २.६ १९३७ चे मुन्शी कमिशन

सन.१८७१ च्या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे करण्याच्या दृष्टीने सन. १९३७ मध्ये भारतीय विद्या भवनचे अध्यक्ष व मुंबई राज्याचे गृहमंत्री के. एम मुंन्शी यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. या कमिशनमध्ये एन. जी जोशी, रा. जी. के चितळे, खान बद्रुद्दिन हाजी हजरत खान, के. बी अंत्रोळीकर, एफ. बी धाबी (रेमिंग्टन सेक्रेटरी आय.सी.एस) या सहा सदस्यांचा समावेश होता. "या कमिशनच्या पाहणीनुसार बाबरी, मांगारूडी, मारवाड, बावरी, उधिया, पारशी, सॉसीया व वडार या सातच जाती गुन्हेगार आहेत."१३ मुंन्शी कमिशनच्या सर्व सदस्यांचा अभ्यासूपणा व भटक्या जाती जमातींच्या विविध प्रश्ना संबंधीची तळमळ उल्लेखनीय होती. त्यामुळे सदर अहवाल गुन्हेगारी जमातीच्या कायद्याच्या वाटचालीतील

एक मैलाचा दगड मानला जातो. या अहवालातील सर्व शिफारशीवरून असे वाटते की, या सर्व शिफारसींची अंमलबजावणी योग्यरीत्या झाली असती, तर या जमातींचे आजचे चित्र बदललेले असते.

**२.७ सन. १९४९ कृ. भी अंत्रोळीकर कमिशन**

सन.१९३७ च्या मुन्शी कमिशनमध्ये डॉ. कृ. भी अंत्रोळीकर यांचा सदस्य म्हणून समावेश होता. "१३ ऑगस्ट १९४९ मध्ये डॉ. कृ. भी अंत्रोळीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले गेले."[१४] या कमिशनमध्ये एकूण नऊ सदस्यांचा समावेश होता. या कमिशनने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे.

१.भटक्यांचे अन्न, वस्त्र, निवाऱ्याचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२.भटक्या जमातीच्या मुलांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे. यासाठी समाजकल्याण अधिकारी यांनी जिल्हा स्कूल बोर्डाला मिळणाऱ्या शासकीय अनुदानात तशी आर्थिक तरतूद करावी.

३.समाजकल्याण अधिकारी यांनी ग्रामोद्योग व सहकार क्षेत्राच्या मदतीने शिलाईकाम, एम्ब्रॉईडरी, कॉप्स इत्यादी प्रकारची प्रशिक्षणे भटक्या जमातीच्या पुरुष व महिलांना देण्याची सोय करावी.

४.भटक्या विमुक्त जमातींना घर व जमीन यांचे हक्क, शासकीय युद्धोत्तर पुनर्वसन योजना क्रमांक २१९ च्या अंतर्गत ०३ गुंठे जमीन घरासाठी प्रत्येक भूमिहीनांना देण्यात यावी.

**२.८ सन. १९५२ चा कायदा**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण भटके-विमुक्त मात्र स्वतंत्र झाले नव्हते. स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये संविधानाच्या रुपाने कायद्याचे राज्य आले. त्याला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी सन. १९२२ मधील पहिली लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक होत असताना, सन. १८७१ मध्ये आदिम भटक्या जमातींवर जो गुन्हेगाराचा शिक्का मारला गेला होता. गुन्हेगार म्हणून संबोधण्यात आलेल्या जाती-जमातींना तारेच्या कुंपणातून मुक्त करण्याची विचारधारा निर्माण झाली. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संसदेत विशेष ठराव मंजूर करून घेतला. पंडितजींच्या या ठरावामुळे ३१ ऑगस्ट १९५२ पासून गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाती जमाती मुक्त झाल्या. त्यामुळे त्यांना विमुक्त असे म्हटले जाऊ लागले. त्यानुसार ते भटके-विमुक्त म्हणून ओळखले जाऊ लागले.

३१ ऑगस्ट १९५२ हा दिवस भटक्या-विमुक्तांनी स्वतंत्रदिन म्हणून साजरा करायला सुरुवात केली. जन्मजात गुन्हेगारी जमाती म्हणून असल्याचा इंग्रजांनी लागलेला डाग पुसला गेला. "१९५२ साली देशातील १९८ जातींना या कायद्यातून मुक्त केले."[१५] म्हणूनही या जमातींना विमुक्त जमाती म्हणतात. जवळजवळ ८१ वर्षे ब्रिटिशांनी भटक्या समाजातील लोकांना सेटलमेंट मध्ये बंदिस्त केले होते. ते पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळाने मुक्त केले व त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनात्मक सवलती देऊन जीवन जगण्यासाठी विशेष संधी दिली.

**३. समारोप**

भारतीय समाजव्यवस्थेतील आर्थिक सत्ता ज्यांच्या ताब्यात होती तो समाज वैभवसंपन्न जीवन जगत होता. ज्यांच्या ताब्यात आर्थिक सत्ता नव्हती त्याला पोट भरण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीने जीवन जगणे भाग

पडत होते. त्यांच्या या प्रवृत्तीला पायबंद घालण्यासाठी धार्मिकतेचा मुलामा चढविण्यात आला, तर पारतंत्र्यात त्याला कायद्याच्या चौकटीत बंदिस्त करण्यात आले. समाज बंधने तोडून भटकंतीचे जीवन जगणाऱ्या समाजास भटका-विमुक्त समाज असे म्हटले गेले. महाराष्ट्रातील भटक्यांचे सांस्कृतिक आकृतिबंध वेगवेगळ्या स्वरूपात दिसतात. सद्यपरिस्थितीत भटका विमुक्त समाज हा नागरी समाज आणि शासन या सर्वांच्या परस्पर सहकार्यातून त्यांच्या प्रगतीचा मार्ग चोखाळत आहे. भटक्या-विमुक्त जाती जमातींसमोर शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वरूपाचे अनेक प्रश्न उभे आहेत.

भटक्या-विमुक्तांमध्ये राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण होत आहे. लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, मोतीराज राठोड, रामनाथ चव्हाण, भीमराव गस्ती, महादेव जानकर यांच्यासारख्या मंडळींनी भटक्या-विमुक्तांच्या चळवळीला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. भटक्या-विमुक्तांनी स्वयंप्रेरणेने आणि आत्मस्फूर्तीने त्यांच्या विकासाच्या वाटा शोधल्या आहेत. आजच्या काळात या भटक्या-विमुक्तांचे नशीब बलवत्तर आहे, ते मुक्त झाले. आता शासनाच्या आशीर्वादाने भटक्या-विमुक्त जाती-जमातींच्या प्रगतीचा मार्ग रुंदावत चालला आहे.

**संदर्भ**


१. कदम ना. धो, (२०१३), "*महाराष्ट्रातील भटका समाज: संस्कृती व साहित्य,*" प्रतिमा प्रकाशन, पुणे – ३०, पृष्ठ.क्र. २९.

२. मांडे प्रभाकर, (१९८३),"*गाववाड्या बाहेर,*" परिमल प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ.क्र.०८.

३. दांडगे आर. जी, (२०१४),"*भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय,*" सुगावा प्रकाशन, पुणे, पृष्ठ.क्र.२७.

४. खरात शंकरराव, "*भटक्या विमुक्त जाती व त्यांचे प्रश्न,*" सुगावा प्रकाशन, पुणे - ३०, पृष्ठ.क्र.२९.

५. उपरोक्त, दांडगे आर. जी, पृष्ठ.क्र.२८.

६. उपरोक्त, खरात शंकरराव, पृष्ठ.क्र.५१ व ५२.

७. माने लक्ष्मण, (१९९७),"*विमुक्तायन: महाराष्ट्रातील विमुक्त जाती एक चिकित्सक अभ्यास,*" यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पृष्ठ.क्र.१२४.

८. सोनवणे बाळासाहेब, (२०१५),"*जातपंचायतीच्या निमित्ताने,*" यशोदीप पब्लिकेशन, पुणे - ३०, पृष्ठ.क्र.९१.

९. उपरोक्त, दांडगे आर. जी, पृष्ठ.क्र.१९.

१०. माने लक्ष्मण, सम्राट जयंती अंक - २००४, "*घटनेच्या प्रकाशन छायेतील भटका अंधार,*" या लेखातून, संपादक - बबन कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, गोकुळराव पास्ता लेन, मुंबई - १४, पृष्ठ.क्र.३३.

११. उपरोक्त, खरात शंकरराव, पृष्ठ.क्र.५१.

१२. चव्हाण रामनाथ, (१९८९),"जाती आणि जमाती" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृष्ठ.क्र.०६.

१३. उपरोक्त, दांडगे आर. जी, पृष्ठ.क्र.२४.

१४. National Commission for Denotified Nomadic and Semi- Nomadic Tribes Ministry of Social Justice & Empowerment Government of India, 9th Floor, Jeevan Prakash Building, 25 KG' Marg, New Delhi – 110001, Page no – 39.

१५. उपरोक्त, दांडगे आर. जी, पृष्ठ.क्र.७७.


PRINCIPAL
Art's & Commerce College